






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ३०.१०.२०२५ | अंक नं. १७३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020














## एसटी बसचालकाला शिवीगाळ करत मारहाण; काचेवर दगड मारुन केले नुकसान, गुन्हा दाखल

नगर - नगर शहरातील स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात एका एसटी बस चालकाला शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली. तसेच बसच्या काचेवर दगड फेकून मारत नुकसान केल्याची घटना २९ ऑक्टोबर रोजी पहाटे ४.४५ च्या सुमारास घडली. या प्रकरणी रोहन भाऊसाहेब वाघमारे (रा.वाघ गल्ली, नालेगाव) याच्याविरुद्ध सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बस चालक अजिनाथ महादेव नाकाडे (वय ३५, रा. संभाजीनगर, वाघोली, पुणे) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ९ वर्षांपासून बस चालक म्हणून कार्यरत आहेत. २९ ऑक्टोबर रोजी पहाटे २ च्या सुमारास त्यांना छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती बसस्थानक येथुन शेगाव-पुणे जाणाऱ्या एस टी बसवरती चालक म्हणुन ड्युटी असल्याने ते व त्यांच्यासोबत ड्युटीस असणारे वाहक विनोद मेघु चव्हाण (रा.बोराडेवाडी मुळशी, ता. हवेली जि.पुणे) हे प्रवासी घेवुन पुणे रोड बसस्थानक स्वस्तिक चौक अहिल्यानगर येथे पहाटे एस टी बस घेवुन आले. पहाटे ४.४५ च्या सुमारास पुणे बसस्थानक, स्वस्तिक चौक येथे प्रवाशांना सोडुन त्यांनी गाडीची नोंद केली व एस टी बस बसस्थानकाचे बाहेर घेत असताना दोन इसम वाटेत त्याच्याकडील मोटारसायकलवरवर बसलेले होते. त्यावेळी चालक नाकाडे यांनी त्यांना गाडी बाजुला घ्या, एस टी बस वळवण्यास अडचण होत आहे, असे म्हणाले असता त्या मोटारसायकलवर पाठीमागे बसलेला इसम त्यांना शिवीगाळ करत म्हणाला की, 'तुझ्या बापाचा रोड आहे का, गाडी काढून घे, आमच्या नादी लागू नको, त्यावेळी ते एस टी बसचे खाली उतरुन मला शिवीगाळ करु नको, तुझी गाडी बाजुला घे, आम्हाला जावु दे, असे म्हणाले असता त्याने हुज्जत घालुन तेथे पडलेला दगड उचलुन नाकाडे यांच्या हातावर फेकुन मारला त्यानंतर त्याने त्यांची गचंडी पकडल्याने त्यांची झटापट होत असल्याचे पाहुन वाहक विनोद चव्हाण हे मदतीला धावुन आले. त्यावेळी दोघे त्यास आवर घालत असताना त्याने दगड घेवुन परत एस टी बसचे समोरील काचेवर फेकुन मारल्याने काचेवर तडा गेला. त्यावेळी सदर प्रकार चालु असताना मोटार सायकलवर समोर बसलेला अनोळखी इसम तेथून निघुन गेला.

मात्र मोटारसायकलवर पाठीमागे बसलेला इसम तेथेच थांबुन परत शिवीगाळ करत असल्याने नाकाडे यांनी डायल ११२ वर कॉल करुन पोलीसांना बोलावुन घेतले. पोलीस आल्यानंतर त्यांना घडलेल्या प्रकाराची माहिती सांगितली. पोलिसांनी शिवीगाळ व मारहाण करणाऱ्याला ताब्यात घेवून त्याचे नाव विचारले असता त्याने रोहन वाघमारे असल्याचे सांगितले. त्यानंतर बस चालक नाकाडे यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी रोहन वाघमारे याच्या विरुद्ध बीएनएस १३२, १२१ (१),१२५ (अ), ३२४ (३), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## 'ई-चलान' दंडासाठी खाजगी मोबाईलचा वापर करणाऱ्या वाहतूक शाखेच्या पोलिसांवर होणार शिस्तभंगाची कारवाई

### अप्पर पोलीस महासंचालकांचा इशारा

नगर - खाजगी मोबाईल वापरून वाहतूक पोलिस ई-चलान प्रणाली मध्ये अपलोड करून सोयीनुसार वाहन मालकांना चुकीच्या पद्धतीने दंड आकारणी करत असल्याचे निदर्शनास आल्याने यापुढे खाजगी मोबाईलद्वारे फोटो काढून सोयीनुसार ई-चलान करताना पोलीस अधिकारी / अंमलदार निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असा इशारा अप्पर पोलीस महासंचालक प्रविण साळुंके यांनी दिला आहे.

याबाबत त्यांनी मुंबई, ठाणे, पुणे, अहिल्यानगर, नागपूर, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवडसह राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि महामार्ग पोलीस ठाण्यांना परिपत्रक पाठविले आहे. या संदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात वाहतूक संघटनांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. याच बैठकीत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. वाहतूक संघटनांच्या प्रतिनिधींनी तक्रार केली की, वाहतुकीचे नियमन करणारे पोलीस अधिकारी/अंमलदार हे त्यांचे खाजगी मोबाईल वापरून एकाच वेळी मोठ्या संख्येने वाहनांचे फोटो काढतात आणि ते सोयीनुसार ई-चलान प्रणालीमध्ये अपलोड करून चुकीचे चलान देतात. अशा तक्रारी करण्यात आल्या होत्या

या तक्रारीनंतर परिवहन मंत्र्यांनी या पद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या कार्यालयाने यापूर्वीही खाजगी मोबाईलचा वापर न करण्याचे आदेश दिले होते. तरीही काही घटकांमध्ये हे नियम पाळले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

अनेक पोलीस अधिकारी/अंमलदार अद्यापही स्वतःच्या खाजगी मोबाईल फोनद्वारे फोटो काढून, वास्तविक वेळ सोडून, ते सोयीनुसार ई-चलान प्रणालीमध्ये अपलोड करतात आणि चुकीच्या पद्धतीने चलान जनरेट करतात. अशा प्रकारे खाजगी मोबाईलद्वारे फोटो काढून सोयीनुसार ई-चलान करताना पोलीस अधिकारी/अंमलदार निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश अप्पर पोलीस महासंचालक प्रविण साळुंके यांनी दिले आहेत. हे आदेश तातडीने अंमलात आणण्यासाठी मुंबई, ठाणे, पुणे, अहिल्यानगर, नागपूर, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवडसह राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि महामार्ग पोलीस ठाण्यांना पत्र पाठवण्यात आले आहे.

## हैदराबादहून उडणारे वैज्ञानिक बलून नगर जिल्ह्यातही येण्याची शक्यता

### प्रशासनाने दिली खबरदारीची सूचना

नगर - हैदराबाद येथील टाटा मूलभूत संशोधन संस्था (TIFR) यांच्यावतीने ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीत वैज्ञानिक संशोधनासाठी हवेतील बलून उड्डाणे करण्यात येणार आहेत. या बलूनपैकी काही बलूनची उपकरणे अहिल्यानगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागात पडण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. या उड्डाणांना भारत सरकारच्या परमाणु ऊर्जा विभाग आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) यांचे सहकार्य लाभले आहे. ही बलून उड्डाणे हैदराबाद येथील ईसीआयएल परिसरातून केली जाणार असून, एकूण दहा बलून आकाशात झेपावतील. या बलूनचा व्यास ५० ते ८५ मीटर असून ते हायड्रोजन वायूने भरलेले असतील. उड्डाणे रात्री ८ ते सकाळी ६.३० या वेळेत होतील.

या बलूनमध्ये बसवलेली वैज्ञानिक उपकरणे सुमारे ३० ते ४२ किलोमीटर उंचीपर्यंत जातील आणि काही तास संशोधन करून पॅराशूटच्या साहाय्याने जमिनीवर उतरतील. वाऱ्याच्या दिशेनुसार ही उपकरणे २०० ते ३५० किलोमीटर अंतरावर येऊ शकतात. त्यामुळे ती महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक या राज्यांतील भागांमध्ये उतरू शकतात.

महाराष्ट्रातील औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, सांगली, सातारा, अहिल्यानगर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, जळगाव आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये उपकरणे पडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने नागरिकांना सूचना दिल्या आहेत. ज्या ठिकाणी ही उपकरणे सापडतील, ती हलवू नयेत, उघडू नयेत किंवा छेडछाड करू नये. त्या पॅकेजवर दिलेल्या

*(पुढील मजकूर पान २ वर)*

## अहिल्यानगरमध्ये प्रथमच २ नोव्हेंबरला १२ तासांचा नॉन स्टॉप 'मिले सूर मेरा तुम्हारा' महासंगीतोत्सव

### कार्यक्रमातून संगीत साधना, आरोग्याची काळजी, नवोदितांना संधी आणि पूरग्रस्त विद्यार्थ्यांना करणार मदत




नगर - अहिल्यानगर शहरामध्ये प्रथमच २ नोव्हेंबर रोजी माउली सभागृह, सावेडी येथे सकाळी १० ते रात्री १० असा नॉन स्टॉप १२ तासांचा सुमधुर हिंदी-मराठी गीतांचा आगळा वेगळा असा महासंगीतोत्सव होत आहे. महेश घावटे, स्वरात्मिक ग्रुप आणि डॉ. दमन काशिद हॉस्पिटल प्रस्तुत या कार्यक्रमामध्ये नगर शहरातील नामवंत ४० हून अधिक गायक आणि गायिका आपली कला सादर करणार आहेत.

या अनोख्या कार्यक्रमामध्ये -संगीत साधना, आरोग्याची काळजी, नवोदितांना संधी आणि पूरग्रस्त विद्यार्थ्यांना भरीव मदत करण्यात येणार असून अशाप्रकारे एकाच छताखाली संगीत सेवा आरोग्य सेवा आणि सामाजिक सेवा अशी त्रिवेणी सांगड घातलेली आहे. सदर कार्यक्रमामधील भाग घेणारे कलाकार हे वय वर्षे १० ते ७५ वयोगटातील असून, नगर शहरातील डॉक्टर, इंजिनियर, व्यावसायिक, नोकरदार, गृहिणी अशा विविध क्षेत्रातील हौशी कलाकार आहेत.

आयोजक महेश घावटे एक व्यवसायिक असून ते गायक आहेत. ते गेल्या चार ते पाच वर्षांपासून नवोदित कलाकारांना संधी देऊन एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. याच उपक्रमा अंतर्गत घावटे यांनी गेल्या वर्षी माउली सभागृह येथे महिला दिना निमित्त सांगीतिक कार्यक्रम घेतलेला होता त्यालाही श्रोत्यांनी प्रतिसाद दिलेला होता. त्याबरोबरच वर्षभरामध्ये सावेडी उपनगरांमधील रावसाहेब पटवर्धन सभागृह, कोहिनुर मंगल कार्यालय अशा विविध ठिकाणी सांगीतिक कार्यक्रमांचे हि ते आयोजन करत असतात. यातून नवोदित कलाकारांना मार्गदर्शन करणे, प्रोत्साहन देणे यासाठी ते नेहमीच उत्साही असतात. यापुढेही संगीतप्रेमींसाठी अशाच प्रकारचे कार्यक्रम करण्याचा त्यांचा मानस आहे

नुकत्याच झालेल्या पूरपरिस्थितीमुळे नगर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान असून, यामध्ये विशेषतः विद्यार्थ्यांचे खूप नुकसान झालेले आहे. सदर बाधित विद्यार्थ्यांना याद्वारे मदतीचे नियोजन आहे. या साठी आयोजक प्रयत्नशील असून यातून विद्यार्थ्यांना भरीव मदत करण्याचा आयोजकांचा मानस आहे.

याबरोबरच माउली सभागृह, सावेडी येथे सकाळी १० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत ऋणानुबंध सामाजिक बहुउद्देशीय संस्था व डॉ. दमन काशीद हॉस्पिटल यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य शिबीराचे हि आयोजन केलेले असून, यामध्ये ठराविक आरोग्य तपासण्या मोफत होणार आहेत. यामध्ये मूळव्याध, हर्निया, अपेंडिक्स तज्ञ, मुतखडा व किडनी विकार तज्ञ, हृदयविकार तज्ञ, नेत्र विकार तज्ञ, कान-नाक-घसा तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, अस्थीविकार तज्ञ, मधुमेह तज्ञ, संधीवात तज्ञ, दंत विकार तज्ञ अशा प्रकारचे नगर मधील नामवंत डॉक्टर्स मार्गदर्शन करणार आहेत. याचाही रसिक श्रोत्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केलेले आहे.

विशेष म्हणजे या कार्यक्रमामध्ये रसिक श्रोत्यांना लकी ड्रॉ द्वारे सोन्याची नथ, चांदीची नाणी, पैठणी, ४२ LED टीव्ही अश्या प्रकारची बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे. यासाठी नगर मधल्या प्रयोजकांचेही सहकार्य मिळालेले आहे. त्या बरोबरच रसिक श्रोत्यांच्या चहा पानाची तसेच अल्प दरात भोजनाची ही व्यवस्था आयोजकांनी केलेली आहे.

सदर कार्यक्रमामध्ये डॉ. दमन काशीद, महेश घावटे, इंजि.अभिजित गायकवाड, अजित रोकडे, डॉ. विवेकानंद कंगे, प्रशांत बंडगर, भानुदास महानुर, अनिल खंडागळे, अजय आदमाने, निलेश महाजन, यशवंत आंबेकर, ॲड.सचिन चंदनशिव, विजय भेंडे, राजू सावंत, राम खुडे,राजेंद्र शहाणे, विजय आंग्रे, सारंग पंधाडे, सुनील भंडारी, *(पुढील मजकूर पान २ वर)*



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या खर्च मर्यादेत दीडपट वाढ

## इच्छुक उमेदवारांसाठी प्रचाराला आर्थिक मोकळीक, निवडणूक आयोगाचा निर्णय

मुंबई – राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी राज्य निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचा निर्णय घेत उमेदवारांच्या निवडणूक खर्च मर्यादेत मोठी वाढ केली आहे. बदलत्या आर्थिक परिस्थिती, वाढती महागाई आणि प्रचार खर्चातील प्रचंड वाढ लक्षात घेता आयोगाने ही मर्यादा दीडपटपर्यंत वाढवली आहे. या निर्णयामुळे उमेदवारांना प्रचारासाठी अधिक आर्थिक मोकळीक मिळणार असून, कायदेशीर चौकटीत राहून प्रभावी प्रचार करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. गेल्या काही वर्षांत डिजिटल माध्यमांवरील प्रचार खर्च, वाहनभाडे, बॅनर्स, सभा आयोजन यांसारख्या बाबींचा खर्च वाढल्याने आयोगाकडे या मर्यादेत बदल करण्याची मागणी होत होती. अखेर आयोगाने ती मान्य केली आहे.

महापालिका निवडणुकांसाठी आतापर्यंत सदस्यसंख्येच्या आधारे खर्च मर्यादा ठरवली जात होती, मात्र आता आयोगाने ती वर्गवारीनुसार निश्चित केली आहे. नव्या नियमानुसार मुंबई, पुणे आणि नागपूर या अ वर्गातील महापालिकांतील नगरसेवक उमेदवारांना १५ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याची परवानगी मिळणार आहे. पिंपरी चिंचवड, ठाणे आणि नाशिकसाठी ही मर्यादा १३ लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. कल्याण–डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि वसई–विरार या ब वर्गातील महापालिकांतील उमेदवारांना ११ लाखांपर्यंत खर्चाची मुभा देण्यात आली आहे. तर अहिल्यानगर सह ड वर्गातील इतर १९ महापालिकांमध्ये उमेदवारांना ९ लाख रुपयांचा खर्च करण्याची परवानगी देण्यात आली आहे. ही सुधारित मर्यादा महागाई आणि आर्थिक वास्तव लक्षात घेऊन निश्चित करण्यात आल्याचे आयोगाच्या सूत्रांनी सांगितले.

नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठीही खर्च मर्यादा तदनुसार बदलण्यात आल्या आहेत. अ वर्ग नगरपरिषदांसाठी नगरसेवकांना ५ लाख आणि थेट निवडणूक लढवणाऱ्या नगराध्यक्षांना १५ लाख रुपयांपर्यंत खर्च करता येणार आहे. ब वर्गात नगरसेवकांसाठी ३.५ लाख आणि नगराध्यक्षांसाठी ११.२५ लाख, तर क वर्गातील नगरपरिषदांमध्ये नगरसेवकांसाठी २.५ लाख आणि नगराध्यक्षांसाठी ७.५ लाख रुपये खर्चाची मर्यादा ठरवण्यात आली आहे. नगरपंचायतींमध्ये मात्र नगरसेवकांसाठी २.२५ लाख आणि नगराध्यक्षांसाठी ६ लाख रुपये अशी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे स्थानिक स्तरावरील उमेदवारांना प्रचाराचे नियोजन वास्तवाशी सुसंगत ठेवता येणार असून, अपारदर्शक खर्च कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### वाढत्या खर्चाच्या काळात जुन्या मर्यादा अप्रासंगिक

आयोगाच्या या निर्णयाचं स्वागत अनेक राजकीय पक्षांनी केलं आहे. राज्यातील बहुतांश नेत्यांचे म्हणणे आहे की, वाढत्या खर्चाच्या काळात जुन्या मर्यादा अप्रासंगिक झाल्या होत्या. मागील काही निवडणुकांमध्ये डिजिटल माध्यमांवरील प्रचार, सोशल मीडिया जाहिराती, कार्यकर्त्यांचे मानधन आणि वाहनभाडे यांवर उमेदवारांना मोठा खर्च करावा लागत होता. त्यामुळे वाढीव मर्यादेमुळे निवडणूक लढवणे सुलभ होईल, अशी भावना उमेदवारांमध्ये आहे. मात्र, काही राजकीय निरीक्षकांनी सावधगिरीचा इशारा देत म्हटलं आहे की, अधिक खर्चाच्या मुभेमुळे पैशाचा प्रभाव वाढू शकतो आणि निवडणुकीत समता व पारदर्शकता राखणे प्रशासनासाठी आव्हान ठरू शकते.

### इच्छुक उमेदवारांनी जनसंपर्क सुरू केला

गेल्या पाच वर्षांपासून राज्यात कोणत्याही स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. या काळात अनेक महापालिका, नगरपरिषदा आणि पंचायत संस्था प्रशासकांच्या अखत्यारीत चालवल्या जात आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुका अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांनी आपापल्या उमेदवारांच्या निवडीसाठी कंबर कसली आहे. मागील काही महिन्यांपासून इच्छुक उमेदवारांनी जनसंपर्क सुरू केला असून, विविध सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये आपली उपस्थिती वाढवली आहे. निवडणुकांची चाहूल लागल्याने अनेकांनी गणेशोत्सव आणि नवरात्रीच्या काळात मंडळांना आर्थिक मदतही केली होती. त्यामुळे या निवडणुका टोकाची ईर्ष्या निर्माण करणाऱ्या ठरण्याची चिन्हे आहेत.

### खरी कसोटी उमेदवारांच्या प्रामाणिक प्रचार पद्धतीचीच

निवडणूक आयोगाच्या सुधारित खर्च मर्यादेमुळे निवडणूक प्रचार अधिक गतिमान होण्याची शक्यता आहे. स्थानिक पातळीवर मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवार आता अधिक व्यापक माध्यमांचा वापर करू शकतील. पारंपरिक पद्धतींसोबतच सोशल मीडिया, व्हिडिओ प्रचार आणि जनसंपर्क मोहीमांवर मोठा भर दिला जाईल. राज्यातील राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना, या निर्णयामुळे निवडणुकीतील चुरस आणखी वाढणार आहे. अखेर आयोगाच्या या निर्णयामुळे प्रचाराचा खेळ अधिक खुला झाला असला तरी, खरी कसोटी उमेदवारांच्या प्रामाणिक प्रचार पद्धतीचीच लागणार आहे.

# डॉ. होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ. होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ. होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ. जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती.

डॉ. होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते.

या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ. होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ. होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ. भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ. होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ. भाभा हे अध्यक्ष होते.

या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ. होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

## हैदराबादहून उडणारे वैज्ञानिक बलून नगर जिल्ह्यातही येण्याची शक्यता

(पान १ वरुन)

पत्त्यावर त्वरित माहिती द्यावी तसेच जवळच्या पोलीस ठाण्याला व प्रशासनाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. उपकरणे सुरक्षित असली तरी त्यामध्ये संवेदनशील वैज्ञानिक साधने असल्याने छेडछाड झाल्यास माहिती नष्ट होऊ शकते.

संशोधन संस्था अशा उपकरणांची माहिती दिलेल्या नागरिकांना योग्य बक्षीस आणि खर्चाची भरपाई देणार आहे. या प्रयोगांविषयीची माहिती गावपातळीपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. पहिले बलून उड्डाण ऑक्टोबरच्या चौथ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पारनेरमध्ये ६ नोव्हेंबर रोजी शिवसेनेचा मेळावा

## सुजित झावरे कार्यकर्त्यांसह करणार प्रवेश





नगर – उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पारनेर येथे ६ नोव्हेंबर रोजी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे आणि माजी जिल्हा परिषद सदस्य सुजित झावरे हे कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश करणार असल्याची माहिती जिल्हा प्रमुख अनिल शिंदे यांनी दिली.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या मेळाव्याद्वारे तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांना भविष्यातील राजकीय दिशा, निवडणूक रणनीती व संघटनात्मक तयारीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सुजित झावरे हे पारनेर तालुक्यातील ओळखलेले नेतृत्व असून त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय भूमिका बजावली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी शिवसेना सज्ज आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण झाली असल्याचे अनिल शिंदे यांनी म्हटले आहे.

या मेळाव्यास पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माजी सैनिकांना राजकीय आरक्षण व स्वीकृत सदस्य पद आरक्षणाची मागणी

## जय हिंद फाउंडेशनकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शिवाजी पालवे यांचे निवेदन





नगर – आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये प्रत्येक स्तरावर माजी सैनिकांसाठी एक आरक्षित जागा देण्यात यावी. ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद या सर्व ठिकाणी एक स्वीकृत सदस्य पद माजी सैनिकांसाठी राखीव ठेवावे. तसेच राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये एक जागा, आणि शिक्षक मतदारसंघाप्रमाणे सैनिक मतदारसंघ तयार करून सात विभागात सात सैनिक आमदार नियुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय विधान परिषद व राज्यसभेत देखील सैनिकांना प्रतिनिधित्व देण्यासाठी एक जागा आरक्षित ठेवावी, अशी मागणी महाराष्ट्रातील माजी सैनिकांना राजकीय क्षेत्रात न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे यासाठी जय हिंद फाउंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनात करण्यात आले आहे. राज्यातील सर्व सैनिक संघटनांच्या माध्यमातूनही ही मागणी जोर धरत असून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपाल आणि निवडणूक आयोग या सर्वांकडे याबाबत सतत पाठपुरावा सुरू असल्याची माहिती फाउंडेशनचे संस्थापक शिवाजी पालवे यांनी दिली.

फाउंडेशनच्या निवेदनात असे म्हटले आहे की, माजी सैनिक राज्यभरात मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य करत आहेत; मात्र, आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्याने अनेकांना निवडणूक लढवणे शक्य होत नाही. अशा सैनिकांचा मान–सन्मान राखण्यासाठी आणि त्यांना सामाजिक व राजकीय क्षेत्रात स्थान देण्यासाठी स्वीकृत सदस्यपदाद्वारे संधी द्यावी.

नुकतेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना जिल्हा परिषदेमध्ये ५ स्वीकृत सदस्य व पंचायत समितीमध्ये २ स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याची मागणी केली होती. सामाजिक कार्यात पुढे असलेल्या पण निवडणूक लढविण्याची परिस्थिती नसलेल्या व्यक्तींना या माध्यमातून संधी मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही निवेदन सादर करण्यात आले आहे.

शिवाजी पालवे यांनी सांगितले की, माजी सैनिक समाजात शिस्त, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव या गुणांचे प्रतीक आहेत. त्यांना राजकीय क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळाल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक आणि अनुशासित होईल. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक ठिकाणी एक स्वीकृत सदस्य पद माजी सैनिकासाठी राखीव ठेवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी सैनिकांच्या मुख्य मागण्या : प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेत माजी सैनिकासाठी एक स्वीकृत सदस्य पद., राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये एक सैनिक, शिक्षक मतदारसंघाप्रमाणे सैनिक मतदारसंघ तयार करून सात विभागात सात सैनिक आमदार., विधान परिषद आणि राज्यसभेत प्रत्येकी एक सैनिक सदस्याचे आरक्षण.



जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत घेतला.

# ‘उद्योग मित्र समिती’च्या कामाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

नगर – जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत घेतला.

बैठकीस महाव्यवस्थापक दीपक शिवदास, औद्योगिक विकास महामंडळाचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, व्यवस्थापक श्याम बिराजदार, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी यांच्यासह अशासकीय सदस्य व संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना आवश्यक त्या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. औद्योगिक क्षेत्रासह शहरालगत असलेल्या ग्रामपंचायतीमधील कचऱ्यासाठी स्वतंत्र डंपिंग यार्ड निर्माण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

औद्योगिक क्षेत्रात असलेल्या फीडरची आवश्यकते प्रमाणे दुरुस्ती करत या भागात अखंडपणे वीज पुरवठा सुरू राहावा, तसेच पाणी पुरवठाही सुरळीत राहण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात. बोल्हेगाव रस्ता दुरुस्ती, सनफार्मा ते निंबळक रस्ता दुरुस्ती या बरोबरीने औद्योगिक क्षेत्रातील उर्वरित अतिक्रमणे तातडीने हटविण्याची सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

## अहिल्यानगरमध्ये १२ तासांचा नॉन स्टॉप ‘मिले सूर मेरा तुम्हारा’ महासंगीतोत्सव

(पान १ वरुन)

डॉ.नितीन जगताप, नरेश बडेकर, संजय माळवदे, वृषाल एकबोटे, संजय भिंगारदिवे, सुशील देठे, अन्वर शेख, बाबासाहेब जगताप, जालिंदर शिंदे, रोनित सुखधान, जीवन महाजन, मास्टर आर्य महाजन, डॉ.गायत्री कुलकर्णी, प्रतीक्षा चांदणे, मोनाली बोरुडे, वैदेही बल्लाळ, वर्षा जांभेकर पुणे, रेणुका पवार, प्रतिभा साबळे, विद्या तन्वर, पूजा गडकरी, प्रा.सारिका रघुवंशी, पूनम कदम, ॲड.किरण जाधव, पल्लवी खरात हे कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानी शिंगवी आणि निवेदक आणि रेडिओ जॉकी प्रवीण पोतदार (मुंबई) हे करणार आहेत.

सकाळी ९.४५ वा मोफत आरोग्य शिबीराचे उद्घाटन होणार असून संगीत कार्यक्रम कार्यक्रम अगदी वेळेत म्हणजे सकाळी १० वाजता सुरु होणार आहे. सदर कार्यक्रमाचे देणगी प्रवेशिका नाममात्र मूल्य १०० रुपये ठेवण्यात आले आहे. श्रोत्यांचा प्रतिसाद पाहता कार्यक्रम हाऊसफुल्ल होत असल्याने नगरकरांनी निराशा टाळण्यासाठी लवकरात लवकर आपली प्रवेशिका आरक्षित करण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आलेले आहे.

प्रवेशिका मिळवण्यासाठी खालील ठिकाणी संपर्क साधावा – श्री स्वामी समर्थ मोबाईल, पारिजात चौक, गुलमोहर रोड सावेडी. ७३५०८८१५१५, ९३२६२३०२३० (महेश घावटे), डॉ काशीद हॉस्पिटल, ओबेरॉय हॉटेल समोर, नगर मनमाड रोड सावेडी, ८९५६३६३६६८ (ज्ञानेश्वर माने), अक्षर ऑफसेट रंगार गल्ली, चितळे रोड, ९३२६२५०८५१, श्री स्वामी समर्थ सुपर मार्केट, नाना चौक, तपोवन रोड सावेडी ९८९०१३६६५५.

## लक्ष्मण सादरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नगर–कल्याण रोड येथील रहिवासी लक्ष्मण शंकर सादरे (दादा, वय ८५) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर ३० ऑक्टोबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते राधाबाई कॉलेज कोळपेवाडी रयत शिक्षण संस्थेचे प्राचार्य होते.

## सविता गांधी यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – श्रीगोंदा तालुक्यातील सिद्धेश्वर क्षेत्र मांडवगण कात्राबाद येथील रहिवासी सौ. सविता गांधी (वय ६२) यांचे २९ ऑक्टोबर रोजी पुणे येथे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, मुलगा, सुन, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दिनेश गांधी यांच्या मातोश्री तर दिलीप गांधी यांच्या त्या पत्नी होत.

## अनिल वांडेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – केडगाव येथील रहिवासी अनिल विठ्ठल वांडेकर (वय ५८) यांचे २८ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, भावजय, १ मुलगा असा परिवार आहे. ते कायनेटीक कंपनीमधून सेवानिवृत्त झाले होते. मोटार वाहन निरीक्षक अमृता वांडेकर यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### पावसाळा व मधुमेह

साखरेच्या रुग्णांची रोगप्रतिकारक शक्ती थोडी कमकुवत असते आणि पावसाळ्यात ती आणखी आव्हानात्मक बनते. जास्त आर्द्रता, तापमानात अचानक चढउतार, अन्नातील निष्काळजीपणा आणि स्वच्छतेचा अभाव हे मधुमेहींच्या आरोग्यासाठी या ऋतूत मोठा धोका बनतात. जर वेळीच खबरदारी घेतली नाही तर रक्तातील साखरेची पातळी असंतुलित होऊ शकते आणि संसर्ग, जखमा बरे होण्यास उशीर, त्वचेचे आजार आणि पचनाच्या समस्या देखील उद्भवू शकतात. मधुमेह हा एक आजार आहे जो आतून प्रभावित करतो आणि पावसाळा त्याला चालना देऊ शकतो. म्हणून, वेळोवेळी साखरेची पातळी, रक्तदाब, लघवी, पायांचे आरोग्य आणि डोळ्यांची तपासणी करणे खूप महत्वाचे आहे. कोणतेही लक्षण लहान नसते, सावधगिरी हाच एकमेव बचाव आहे. तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासत रहा आणि वेळेवर औषधे घ्या. घरगुती उपाय करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## पाककला

### व्हिक्टोरिया वडा

**साहित्य :** १ कप भिजवलेली मूग डाळ, २ हिरव्या मिरच्या, काही कडीपत्ता पाने, १ इंच आल, चवीनुसार मीठ, १ टीस्पून लाल तिखट, १/४ टीस्पून हळद, कुटलेले धणे, बडीशोप आणि जीरे, १ टीस्पून धणे पूड, १ टीस्पून कसुरी मेथी, १ टेबलस्पून मोहरीचे गरम तेल, तळण्यासाठी तेल,

**कृती :** सर्व प्रथम मूग डाळ स्वच्छ धुवून त्यात पाणी घालून ४ तास भिजत घालावी. नंतर डाळ उपसून ती मिक्सरच्या भांड्यामध्ये घाला. त्यात कडीपत्ता, मिरची आणि आलं घालून कोर्स वाटून घ्या. तयार डाळ एका मिक्सिंग वाटी मध्ये काढून घ्या. त्यात वरील सर्व जिन्नस घालून मिक्स करा व शेवटी मोहरीचे तेल गरम करून त्यात घाला. आणि डाळ व्यवस्थित फेटून घ्या.

एका वाटीला ओला सुटी कपडा दाखवल्या प्रमाणे गुंडाळून घ्या. त्यावर तयार मिश्रण थापून घ्या. कढई मध्ये तेल गरम करून त्यात थापलेले वडे अलगद सोडून तळून घ्या. वडे पुरी सारखे फुटतील. अतिरिक्त तेल काढून घ्या.

## वास्तू

### किचन संबंधी

* बेडरूमच्या वर अथवा खाली स्वयंपाक घर असू नये.
* स्वयंपाक घराच्या दरवाज्यासमोर शेगडी नसावी.
* स्वयंपाक घराच्या भिंतीना काळा रंग कधीच देऊ नये.
* किचनचा ओटा काळ्या ग्रॅनाईटपासून बनवू नये. हिरवा आदी रंगांचा असावा.
* किचन सिंक ईशान्य अथवा उत्तर दिशेला असणं शुभ मानलं जातं.

## सल्ला

टोमॅटो संपले असतील तर ग्रेव्ही करताना तुम्ही टोमॅटो केचपचा वापर करू शकता.

## सौंदर्य

बहुतेक लोक त्यांच्या चेहऱ्यावरील मेकअप काढण्यासाठी वाईप्सचा वापर करतात. पण वाइप्सच्या अतिवापरामुळे आपल्या चेहऱ्याची त्वचा सैल होऊ लागते. चेहऱ्यावरील मेकअप काढण्यासाठी तुम्ही खोबरेल तेल वापरू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, धनिष्ठा १८।५१, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : कोणाकडून पूर्वी कर्ज घेतले असेल तर आज तुम्ही ते फेडण्यात यशस्वी व्हाल. आज तुम्ही तुमच्या मित्रासोबत पार्टी कराल.

**वृषभ** : आरोग्याबाबत जागरूक राहावे लागेल. गोड बोलून समोरच्यांकडून आपले काम काढून घेण्याची कला आज आत्मसात करावी लागेल.

**मिथुन** : आज कोणतीही मालमत्ता खरेदी किंवा विक्री करण्याचा विचार करत असाल तर वडिलांचा सल्ला घेऊन त्यातील कायदेशीर बाबींचा अभ्यास करावा लागेल

**कर्क** : आज जर तुम्हाला घरामध्ये किंवा व्यवसायात कोणाच्या बोलण्याचे वाईट वाटले तर गोष्टी तुमच्या मनात ठेवा त्यांना काही बोलायला जाऊ नका.

**सिंह** : नोकरीच्या शोधात असणाऱ्या लोकांना आज चांगली संधी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**कन्या** : भविष्यात तुमची फसवणूक होऊ शकते. आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून आदर मिळेल.

**तूळ** : मनासारखी नोकरी मिळाल्याने तुम्हाला आनंद होईल. आज संध्याकाळी तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत धार्मिक स्थळी जाल.

**वृश्चिक** : काही प्रभावशाली लोकांकडून एखादी महत्वाची माहिती देखील मिळू शकेल. तुम्ही उधार दिलेले पैसे आज परत मिळतील. ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल.

**धनु** : आजचा दिवस तुमच्या साहस आणि शौर्यामध्ये वाढ करणारा असेल. नोकरदार लोकांना आज सहकाऱ्यांसोबत फिरायला जाण्याची संधी मिळू शकते.


**मकर** : आज तुम्ही तुमच्या प्रगतीने तुमच्या कुटुंबातील सदस्यांना आश्चर्यचकित करू शकता. मुलाच्या अचानक आजारपणामुळे तुम्हाला धावपळ करावी लागू शकते

**कुंभ** : आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदी असेल. नवीन वाहन खरेदी करण्यासाठी आज कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घेऊ शकता.

**मीन** : परस्पर प्रेम वाढेल. व्यवसायातही तुमचे कोणी शत्रू असतील तर आज ते तुमच्यापुढे नतमस्तक होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२९२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) परत करण्याच्या कराराने मागून आणलेले (वस्तू, पैसे वगैरे) ५) उपहास; फजिती; हुर्यो ६) पदार्थाचा उडालेला तुकडा ८) अरबस्तानात असलेले मुस्लिमांचे एक धर्मस्थळ ११) चल; हेर; खंदक १२) आठवड्यातील कोणताही दिवस किंवा वार १४) पदार्थाचा अतिलहान अंश १५) वाघाचे ओरडणे १७) जेथे कामगारांद्वारे वस्तू उत्पादित केल्या जातात ती जागा २०) रंक; दीन: निर्धन २२) एकरूप; तादात्म्य २३) प्रवाहाचे आणलेले पाणी २४) बांगलादेशचे चलन

**उभे शब्द :-** १) दक्षिण भारतातील थंड हवेचे एक ठिकाण २) माळ; हार; तुलना; बरोबरी ३) बळ; दम; जोर; भार; वजन; निकड ४) कारण नसताना ७) धाक; दरारा; जरब ८) मळालेला ९) फटाके वाजविण्याचा सण १०) बाई; स्त्री; महिला १३) अगदी गोल; वाटोळा १६) मऊ; मवाळ; नरम १७) कडक पाठ असलेला एक जलचर १८) मिठाची चव १९) नासलेला २०) फळातील रसाळ भाग; मगज २१) दाट झाडी असलेली जागा

शब्दगंध क्र. ७२९१ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : स्वार्थ साधून तीर्थ करण्यात काहीच अर्थ नाही... इतकं जरी समजलं तरी जन्म व्यर्थ नसतो...

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मोबाईलचा शोध कोणत्या शतकात लागला?

मोबाईल फोनचा शोध विसाव्या शतकात लागला. सुरुवातीच्या मोबाईलचा शोध १९७० किंवा १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला लागला. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात, ते फक्त श्रीमंत लोकांसाठी किंवा वेगवेगळ्या ठिकाणी काम करणाऱ्या प्लंबर आणि इलेक्ट्रिशियनसारख्या कारागिरांसाठी परवडणारे होते. १९९० च्या दशकाच्या मध्यापर्यंत, ते सर्वांना परवडणारे झाले. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात स्मार्टफोनचा शोध लागला.

पण जर तुम्ही मोबाइल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खेळण्याबद्दल किंवा कलाकृतीबद्दल बोलत असाल, जिथे विविध वस्तू वेगवेगळ्या लटकणाऱ्या दांड्यांपासून लटकवल्या जातात, तर ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीनुसार, या शब्दाचा पहिला वापर १९३२ मध्ये अलेक्झांडर काल्डरच्या कलाकृतींचे वर्णन करण्यासाठी झाला होता.

भ्रमणध्वनी हे एक इलेक्ट्रॉनिक्स उपकरण (यंत्र) असून याचा दूरसंचारासाठी उपयोग केला जातो. याला इंग्रजीमध्ये मोबाईल फोन (मोबाईल) किंवा सेल्युलर फोन (सेल फोन) असे म्हणतात. भ्रमणध्वनीच्या साहाय्याने संभाषणाची व माहितीची देवाणघेवाण करता येते. पारंपरिक दूरध्वनी उपकरणे घरामध्ये एकाच जागी ठेवून वापरावी लागतात.

जगातील पहिला मोबाईल फोन मोटोरोला कंपनीच्या मार्टिन कूपर ह्या व्यक्तीने १९७३ साली विकसित केला व वापरून दाखवला. १९९० साली जगभरात १.२४ कोटी मोबाईल फोन वापरकर्ते होते. २००९ साला अखेरीस हा आकडा ४.६ अब्ज इतका आहे. सध्या विकसित देशांमधील १०० व्यक्तींपैकी ९७ तर जगातील १०० व्यक्तींपैकी ४५ व्यक्ती मोबाईल फोन वापरतात.

### कर्णपुत्र वृषकेतू

कौरव पांडवांच्या महायुद्धात कौरवांचा नाश झाला. पण या युद्धात अर्जुनपुत्र अभिमन्यू तसेच भीम व पद्मावती यांचा एक मुलगा धारातीर्थी पडला. अभिमन्यूची तर तो पडल्यावरही कौरवांनी विटंबना केली. यामुळे अर्जुनाचा राग अनावर झाला. आपणही कौरवांच्या पोराबाळांचा नाश करावा, असे त्याला वाटले. कौरवांचे पुत्र तसेच उदरातील पुरुषगर्भ या सर्वांचा नाश करणारा वज्रबाण त्याने अभिमंत्रून सोडला. त्याच्या प्रभावाने कौरवांचे हजारो पुत्र मरण पावले. याच वेळी कर्णाची एक पत्नी प्रभावती प्रसूत होऊन तिला वृषकेतू नावाचा मुलगा झाला होता. कर्ण दोनच दिवसांपूर्वी रणात पडला होता. आता निदान हा वृषकेतू तरी वाचावा म्हणून ती धृतराष्ट्राकडे त्याला घेऊन गेली व त्याचे संरक्षण करण्यासाठी विनवू लागली.

पण धृतराष्ट्राने असहायता व्यक्त केली. यानंतर प्रभावती वृषकेतूला घेऊन कुंतीकडे गेली. कुंतीला त्याला पाहून कर्णाची आठवण झाली. त्याच्या मुलाला आपण वाचवले पाहिजे, असे तिला वाटले. एवढ्यात अर्जुनाचा बाण तेथे आला. पण कुंतीने त्याला परत जाण्याची आज्ञा केली. याप्रमाणे वृषकेतूची जबाबदारी कुंतीवर सोपवून प्रभावती कर्णाबरोबर सती गेली.

कुंती मोठ्या प्रेमाने पण गुप्तपणे त्याचे पालनपोषण करू लागली. पुढे वृषकेतू थोडा मोठा झाल्यावर त्याला हे असे राहणे नकोसे वाटू लागले. कुंतीने त्याला सर्व हकिगत सांगितल्यावरही तो आपल्या नशिबावर विसंबून उघडपणे राहतो म्हणू लागला. पुढे तो द्रौपदीच्या दृष्टीस पडला. हा सुंदर व तेजस्वी मुलगा तिला आवडला. कुंतीप्रमाणे तीही त्याच्याशी प्रेमाने वागू लागली. द्रुपदराजाकडून मिळालेले एक धनुष्यही त्याला दिले. कुंती वृषकेतूला धर्मार्जुनापासून काही त्रास होऊ नये म्हणून जपत असे. तो स्वसंरक्षणासाठी सिद्ध व्हावा म्हणून तिने सूर्याचे स्मरण केले. कर्ण सूर्याचा मुलगा असल्याने सूर्याने वृषकेतूला सर्व विद्या शिकवल्या.

पुढे अश्वमेध यज्ञप्रसंगी कुंती वृषकेतूला घेऊन पांडवांकडे गेली. जो आपल्या कुळाला सोडून शत्रुपक्षाकडे गेला, धर्मासारख्या साधूचा ज्याने आश्रय सोडला, त्या आपल्या पित्याला पांडवांनी मारल्याबद्दल आता त्याला फारसा विषाद वाटेना. कर्णपुत्राची एकंदर हकिगत ऐकून सर्व पांडवांना कर्णाबद्दल अतिशय वाईट वाटले. कर्णपुत्राचा आपल्याला लाभ झाला म्हणून त्यांना समाधान वाटले.

## जीवन का अमृत (भाग १)



पर जब हमें अपनी कमियों का अहसास होगा, तभी हम इन्हें दूर कर सकते हैं और सही दिशा में बढ़ सकते हैं। सत्संग को तर्क-वितर्क की जगह न बनाओ। नामलेवाओं को सलाह दी जाती है कि वे किसी भी विवादास्पद प्रश्न से दूर रहें। पर इसका मतलब यह नहीं कि आप किसी भी प्रश्न, जो इस पवित्र रास्ते से संबंधित है, पर रोशनी न डालें। विक्रम रहकर, हर आलोचना से, किसी को ऊँचा या नीचा दिखाने से या एक खुले वाद-विवाद से दूर रहना चाहिए।

अपने पति के प्रति आपकी टिप्पणियों को मैंने पढ़ा। वह मुझे बहुत प्रिय है और मैं उसकी रूहानी सफलता की कामना करता हूँ। उसके प्रति आपका रवैया दयालुता और धैर्य का होना चाहिये। आप कभी भी बेसब्र न हों, बल्कि सहनशील रहें। सभी

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

आध्यात्मिक जिज्ञासु ऐसी अनूठी सहनशीलता और नम्रता को धारण करें, ताकि दूसरे लोग जान सकें कि वे एक जिंदा सत्गुरु से संबंधित हैं। एक संतुलित मन कभी भी छोटी सी बात से विचलित नहीं होता। हम पानी में ही तैरना सीख सकते हैं और हम अपने रोजमर्रा के जीवन को ऐसा बनाएँ कि हम रोजाना कोई न कोई नई चीज सीखें। धैर्य तथा नम्रता का होना और अहम् भाव का नाश ऐसे प्रभावशाली गुण हैं, जिन्हें एक नामलेवा की जिंदगी में मुख्य स्थान मिलना चाहिए। आप समय आने पर इस क्षेत्र में तरक्की करेंगी। जो व्यक्ति, अपने बारे में दूसरों के विचारों से प्रभावित और विचलित हो जाता है, वह अवश्य ही अभी तक अपने अहंकार के वश में है, उसने अपने अहम् को नहीं जीता है और वह रूहानियत की क, ख, ग को भी नहीं समझा है।

प्रेम और आत्मसमर्पण को अपने जीवन का आधार बना लो। ऐसा करने पर तुम पाओगे कि तुम्हारी जिंदगी रोज एक वरदान है। यह रास्ता सीधा, तंग और मुश्किल, बहुत मुश्किल और सधा हुआ है, पर जो सच्चा जीवन जीता है, उसको हर प्रकार की सहायता का वायदा है, ताकि वह लक्ष्य को प्राप्त कर सके। सदाचारी जीवन के लिए जरूरी सद्गुणों का विकास हम धैर्य से, प्रबल इच्छा पैदा करके कर सकते है और हमारी जो भी कमियाँ हैं, उन्हें हम सावधान और सतर्क रहकर निकाल सकते हैं।

कृपया दूसरे लिंग के व्यक्ति की आँखों में भी देखने से बचें। एक सच्चा, विनम्र और आज्ञाकारी आध्यात्मिक जिज्ञासु अपनी कोशिशों को ऊपर काम कर रहीं दयालु गुरु-शक्ति को समर्पित करके, किसी भी परिस्थिति को पार कर जाएगा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

ऐसे लोग अपराध बोध से ग्रसित हो जाते हैं। आप ध्यान साधना में बैठे और मन सिनेमा, सीरियल एवं क्रिकेट आदि में लगा रहता है तो यह एकाग्रता नहीं है। आपका आज्ञा चक्र बीमार है, कमजोर है। ऐसी दशा में लोग खाना पीना, घरेलू कामकाज, दोस्ती, रिश्तेदारी सब छोड़ कर साधना करने लगते हैं।

आहार से हमें शारीरिक और मानसिक शक्ति मिलती है। खाना न खाने से दिमाग की कोशिकायें नष्ट होने लगती हैं। दिमाग की कोशिकायें अगर एक बार नष्ट हो जाती हैं तो दुबारा कभी जीवित नहीं होती। मनुष्य उम्र भर शारीरिक और मानसिक रुप से बीमार रहने लगता है। सम्पूर्ण भोजन करो और बाजार का खाना बंद करो। अगर नींद पूरी नहीं करते हैं तो दिमाग का वह हिस्सा जो एकाग्रता को नियंत्रित करता है कमजोर हो जाता है और इस का असर आप के कार्यों एवं साधना पर भी पड़ता है। इसलिये पूर्ण नींद लेनी चाहिये। कई बार साधना में बैठते तो हैं परंतु मन पेन्डिंग कामों पर चला जाता है

### आज्ञा चक्र

। मन फिल्मों की ओर चला जाता है, सीरियल और क्रिकेट मैच आदि पर चला जाता है। इस का कारण यह है कि आज्ञा चक्र कमजोर है।

ऐसी दशा में जो भी काम याद आये उन्हें लिख लो फिर उन्हें बाद में पूरा करो और लिस्ट से काट दो। लिख लेने से वे बातें बार बार नहीं आयेगीं। आप साधना में लगे रहेंगे। कुछ कड़वी स्मृतियां मनो मस्तिष्क पर छाई रहती हैं, इस का प्रतिकूल प्रभाव दिमाग पर पड़ता है और स्मरण रखने योग्य बातें वा ज्ञान के बिंदू हमें याद नहीं रहते। जिस से खाली खाली महसूस करते हैं। ऐसी दशा में अपनी मन पसंद पुस्तकें पढ़ा करो। कहानीयों की पुस्तकें पढ़ने से ज्ञान की पोइंटस सहज याद रहती हैं। कई बाते एकाग्रता में भंग डालती हैं, ऐसी जितनी भी बातें वा काम याद आयें उन्हें प्यार से कहते रहो अभी मैं भगवान को याद कर रहा हूं तुम्हारे बारे बाद में सोचूगां और उन पर सोचने के लिये एक समय निर्धारित कर लो। उस निर्धारित समय ही उन के बारे सोचें। कुछ बुरी बाते जिनके बारे हम कुछ नहीं कर सकते उन्हे बुरा सपना समझ भूल जाओ। उन घटनाओं से सम्बंधित जो व्यक्ति हैं उन को मन में कहते रहो आप का कल्याण हो। लेट कर या आराम से लिहाफ ओढ़ कर साधना करते हैं या पढ़ते हैं तो उन्हे उस समय नींद बहुत सताती है या सिरदर्द होने लगता है। सही मुद्रा में सीधे बैठ कर पढ़ें या साधना करें। लेट कर या टेबल पर झुक कर ना बैठें। इस से आज्ञा चक्र शक्तिशाली बनता है। नींद नहीं आती। साधना में बैठते हैं या और कोई पढ़ने लिखने का काम करते हैं तो शुरू में ध्यान ठीक से एकाग्र रहता है पर बाद में एकाग्रता भंग हो जाती है। दिमाग भटकने लगता है। एक साथ कई चीजें मन की एकाग्रता को रोक रही होती हैं मन इधर उधर भटक रहा होता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**तरुण :** महाराज, मी इंजिनिअर आहे. नोकरी लागत नाहीये काही उपाय सुचवा
**ज्योतिषी :** कोणत्या शाखेचा इंजिनिअर आहेस, बाळा?
**तरुण :** इलेक्ट्रिकल्स्
**ज्योतिषी :** मग मला माहित नाही, कारण मी मेकॅनिकलचा आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आशियाई क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी कोणाची नियुक्ती झाली आहे?
  – शम्मी सिल्वा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

अशा वेळी जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून सहसा बालकाला स्वच्छ जागेत खेळायला ठेवून स्वच्छ धुतलेली खेळणी खेळण्यास द्यावी व बालन तोंडात कोणतीही वस्तू घालणार नाही, याकडे लक्ष ठेवावे.

ज्या व्याधीमध्ये स्मरणशक्ती व पूर्वी घेतलेल्या अनुभवांचा नाश होतो व स्मृती कमी होते. त्या व्याधीस अपस्मार असे म्हणतात. चरकाचार्यांनी स्मृतिनाशाबरोबरच बुद्धी व सत्त्व यांची विकृती होऊन विकृत हालचाली करीत रुग्ण मुर्च्छित हातो, त्याला अपस्मार असे म्हटले आहे. व्यावहारिक भाषेत यालाच झटके येणे, फेफरे येणे असे म्हणतात. जन्म होताना नकळत मेंदूला मार लागणे, शरीरातील साखरेचे प्रमाण कमी होणे, कॅल्शिअमची कमतरता असणे, मेंदूत ताप येणे, जंतुसंसर्ग जास्त प्रमाणात होणे, काम, भीती, क्रोध, शोक यांचा म

### बालकांचे आजार

नावर विकृत परिणाम होणे, मनोदोष वाढून रज व तम या गुणांची वाढ होणे, यामुळे अपस्मार व्याधी निर्माण होते. डोळ्यांसमोर अंधारी येणे, तोंडाला फेस येणे, शरीराच्या हालचालीत अचानक विकृती होणे, हातापायांच्या विक्षिप्त हालचाली करणे, मूर्च्छित होत असताना चित्रविचित्र दृश्य दिसणे, भुवया व डोळे यांच्या विचित्र हालचाली करणे, ज्या वेळी फेकरे येतात, त्या वेळी वर्तमान व भूतकाळ अशा दोन्ही वेळेचे ज्ञान नष्ट होणे होते.

बालक मुर्च्छित अवस्थेत पडते. हातांच्या मुठी आवळल्या जातात. श्वासावरोध होतो. ही अवस्था थोडा वेळ टिकते व बालक पुन्हा गाढ झोपी जाते. काही काळाने बाल पूर्ववत स्थितीला येते व असे फेफरे काही कालावधीच्या अंतराने बालकाला पुन्हा पुन्हा येऊ शकतात. ज्या वेळी झटका येतो, त्या वेळी बालकाला जवळच्या परिस्थितीचे भान न राहिल्याने अनेक स्वरुपाचे अपघात घडतात. म्हणून फेफरे येणाऱ्या बालकाला पाणी, आग, स्वयंपाक खोली, इतर यंत्रे व वाहन चालविणे यांपासून दूर ठेवावे.

झटका आला असताना बालकाची दातखिळी बसली असेल, तर ती मोकळी करावी. अपस्माराच्या झटक्यातून सावध करण्यासाठी तीक्ष्ण अंजन, धूप व नस्य यांचा उपयोग करावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जागतिक बचत दिन
## आर्थिक जबाबदारीचे सामाजिक भान

जागतिकीकरणाच्या, उपभोगतावादाच्या आणि झपाट्याने बदलणाऱ्या आर्थिक व्यवस्थेच्या या युगात 'बचत' ही केवळ आर्थिक क्रिया न राहता ती एक सामाजिक मूल्य, संस्कृती आणि नागरिक जबाबदारी म्हणून पाहिली जाऊ लागली आहे. दरवर्षी ३० ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा 'जागतिक बचत दिन (World Thrift Day)' म्हणजे केवळ आर्थिक संस्थांचा उत्सव नसून, तो व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या एकत्रित शाश्वत भविष्यासाठीची सजगता दाखवणारा दिवस आहे. या दिवसाची संकल्पना दुसऱ्या महायुद्धाच्या काळानंतर निर्माण झाली. १९२४ मध्ये इटलीतील मिलान येथे झालेल्या पहिल्या International Savings Bank Congress मध्ये या दिनाचे औचित्य जाहीर करण्यात आले. त्यामागील उद्दिष्ट होते की लोकांना बचतीचे महत्त्व समजावून सांगणे, आणि 'थोडे आज राखले तर उद्याचा दिवस सुरक्षित राहील' हा मूलभूत विचार जनमानसात रुजवणे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, 'बचत' ही फक्त पैशाची साठवणूक नाही; ती समाजाच्या मूल्यव्यवस्थेचा आणि सांस्कृतिक शिस्तीचा भाग आहे. प्रत्येक समाजाची आर्थिक रचना त्याच्या सामाजिक वृत्तीवर आधारित असते. मॅक्स वेबर यांनी मांडलेल्या "Protestant Ethic and the Spirit of Capitalism' या सिद्धांतानुसार, आर्थिक शिस्त, मेहनतीची सवय आणि बचतीची वृत्ती या गोष्टी भांडवलशाहीच्या वाढीस कारणीभूत ठरल्या. यावरून दिसते की बचत ही केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचीही गुरुकिल्ली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारपणे संसाधनांचा वापर करणे आणि उद्यासाठी काही राखून ठेवणे हेच शाश्वत समाजाचे लक्षण आहे.

भारतीय समाजाच्या पारंपरिक संरचनेत 'बचत' ही संकल्पना फार जुनी आहे. भारतीय संस्कृतीत 'अर्धेच खा, उरलेले उद्यासाठी राखून ठेवा' अशी जीवनशैली सुचवण्यात आली होती. आपल्याकडे 'मावळता सूर्य पाहून दिवा विझवू नका' अशी म्हण आहे, तिच्यामागेही भविष्याची तयारी, नियोजन आणि शिस्तबद्धता यांचा संकेत आहे. ग्रामिण समाजात पूर्वी घरात धान्य, बियाणे, किंवा पैशाचा थोडासा साठा ठेवण्याची सवय होती. स्त्रिया आपल्या अल्प उत्पन्नातूनही सोन्याचे दागिने, धान्य किंवा थोडेसे पैसे साठवून ठेवत असत हेच प्रत्यक्षात 'घरोघरी बचत संस्कृतीचे' पहिले रूप होते.

आजच्या आधुनिक समाजात मात्र उपभोगतावादाची प्रवृत्ती वाढली आहे. त्वरित समाधान, लक्झरीचा मोह आणि क्रेडिट कार्ड संस्कृती यामुळे 'उद्यासाठी बचत' ही कल्पना मागे पडत चालली आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे परिवर्तन आहे. एक काळ असा होता की बचत ही 'मध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेचा' आधार होती. पण आता ती हळूहळू 'उपभोगवादी संस्कृतीच्या' प्रभावाखाली दबली आहे. जाहिराती, सोशल मीडिया, ब्रँडेड जीवनशैली, आणि कर्जाधारित अर्थव्यवस्था यांनी व्यक्तीच्या विचारांवर परिणाम केला आहे. 'आत्ताच खर्च करा, नंतर विचार करा' ही मानसिकता नव्या पिढीच्या जीवनशैलीत शिरली आहे. या प्रवृत्तीचा परिणाम केवळ आर्थिक नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक अस्थैर्य निर्माण करणारा आहे. समाजशास्त्रानुसार, बचत ही सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा पाया आहे. जे समाज भविष्यासाठी नियोजन करतात, संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करतात आणि अनावश्यक खर्च टाळतात, ते समाज संकटकाळात अधिक मजबूत राहतात. उदा. कोविड-१९ महामारीच्या काळात ज्या कुटुंबांकडे थोडीफार बचत होती, त्यांनी रोजगार, उत्पन्न आणि आरोग्य संकटांना अधिक चांगल्या प्रकारे सामोरे गेले. दुसरीकडे, अनियोजित खर्च करणाऱ्या, किंवा 'दिवसेंदिवस जगणाऱ्या' कुटुंबांना अत्यंत आर्थिक ताण सहन करावा लागला. त्यामुळे बचत ही केवळ वैयक्तिक नाही तर सामूहिक सामाजिक स्थैर्याची गुरुकिल्ली आहे.

भारतीय ग्रामीण समाजात बचतीचे रूप 'स्वयं-सहायता गटां'द्वारे अधिक दृढ झाले आहे. महाराष्ट्रातील महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून केवळ आर्थिक स्वावलंबनच मिळवले नाही, तर सामाजिक निर्णय प्रक्रियेतही आपला सहभाग वाढवला आहे. अशा गटांनी बचतीची संस्कृती समाजाच्या तळागाळात रुजवली आहे. याला समाजशास्त्रीय अर्थाने 'ग्रामस्तरीय सामाजिक पूंजी' (social capital) म्हणता येईल. बचतीद्वारे निर्माण झालेला हा सामाजिक विश्वास आणि सहकार्याचा पाया, समाजातील परस्परावलंबित्व अधिक दृढ करतो.

अर्थशास्त्रज्ञ ॲमर्त्य सेन यांनी सांगितले आहे की, विकास म्हणजे केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर मानवी क्षमतांची वाढ होय. बचत हे त्या क्षमतावृद्धीचे मूलभूत साधन आहे. बचत आपल्याला स्वावलंबन देते, निर्णयक्षमता वाढवते आणि जीवनातील अनिश्चिततेविरुद्ध सुरक्षा कवच तयार करते. जेव्हा समाजातील प्रत्येक घटक बचतीचे महत्त्व ओळखतो, तेव्हा समाजात 'आर्थिक लोकशाही' मजबूत होते. याचा अर्थ, समाजातील सर्व स्तरांना आपल्या गरजा पूर्ण करण्याची आणि भविष्यासाठी नियोजन करण्याची समान संधी मिळते. जागतिक बचत दिनाचा उद्देश केवळ बँकांमध्ये पैसे ठेवण्यापुरता मर्यादित नाही. त्यामागे एक व्यापक सामाजिक अर्थ आहे, तो म्हणजे 'जबाबदार उपभोग' आणि 'शाश्वत विकास' होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, बचत आणि शाश्वतता या एकमेकांशी घट्ट निगडित संकल्पना आहेत. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संसाधनांचा वापर मर्यादित केला आणि उद्यासाठी थोडे राखून ठेवले, तर समाजातील विषमता कमी होईल. अशा प्रकारे बचत ही समानतेच्या सामाजिक तत्त्वाची पायाभरणी करते. पण बचत केवळ आर्थिक न राहता ती मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपातही आवश्यक आहे. वेळेची बचत, ऊर्जेची बचत, संसाधनांची बचत हे सर्व 'सामाजिक जबाबदारी'च्या रूपात पाहायला हवे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जेची बचत आणि संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन ही समाजशास्त्रीय दृष्टीने 'सामूहिक बचत संस्कृती'चीच विस्तारित रूपे आहेत. समाजातील ही जागरूकताच शाश्वत समाज निर्माण करू शकते.

शिक्षणक्षेत्रातही बचतीची संस्कृती रुजवणे आवश्यक आहे. शाळांमध्ये आर्थिक साक्षरता, बचतीचे महत्त्व आणि संसाधन व्यवस्थापन यावर शिक्षण दिले गेले तर नवी पिढी अधिक जबाबदार नागरिक म्हणून घडेल. जर्मनी, जपान, स्वित्झर्लंडसारख्या देशांनी आपल्या नागरिकांमध्ये लहानपणापासून बचतीची सवय लावली आणि त्यामुळेच त्यांचे समाज आर्थिकदृष्ट्या स्थिर झाले. भारतातही 'पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज', 'जन-धन योजना', 'सुकन्या समृद्धी योजना' अशा उपक्रमांद्वारे सरकारने बचतीचा प्रसार करण्याचे प्रयत्न केले आहेत. पण खरी गरज आहे ती 'बचत ही समाजाचा सांस्कृतिक स्वभाव बनवणे' या उद्दिष्टाची. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाइम यांनी सांगितले की, समाजातील नैतिक मूल्ये आणि नियम हे समाजाच्या एकात्मतेचे सूत्र आहेत. बचतीची संस्कृतीही असेच एक नैतिक मूल्य आहे. ती व्यक्तीला संयम, आत्मशिस्त आणि उत्तरदायित्व शिकवते. या मूल्यांच्या आधारे समाजात स्थैर्य आणि एकात्मता निर्माण होते. म्हणूनच जागतिक बचत दिन हा फक्त आर्थिक शिक्षणाचा दिवस नाही; तो सामाजिक नैतिकतेच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. आधुनिक काळातील डिजिटल व्यवहार, ऑनलाइन गुंतवणूकीच्या युगात बचतीची संकल्पना नवे रूप घेत आहे. डिजिटल बँकिंग, यूपीआय, मोबाईल वॉलेट यामुळे व्यवहार सोपे झाले आहेत, पण त्याचबरोबर 'त्वरित खर्च' करण्याची प्रवृत्तीही वाढली आहे. म्हणूनच डिजिटल बचतीचे शहाणपण आवश्यक आहे, म्हणजेच नियोजनपूर्वक गुंतवणूक, सुरक्षित वित्तीय साधनांची निवड आणि फसवणुकीपासून संरक्षण होय. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ही डिजिटल बचतसंस्कृती म्हणजे 'आधुनिक समाजातील आर्थिक साक्षरतेचा' एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

शेवटी, बचत ही फक्त पैशाची गोष्ट नाही, ती भविष्याची, स्थैर्याची आणि जबाबदारीची गोष्ट आहे. जो समाज आजची गरज आणि उद्याची तयारी यांच्यात समतोल राखतो, तोच समाज खऱ्या अर्थाने प्रगत होतो. म्हणूनच जागतिक बचत दिन हा प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. आपण आज किती खर्च करतो आणि उद्यासाठी किती राखून ठेवतो? समाजशास्त्र सांगते की, व्यक्तीचा विवेकशील आर्थिक निर्णय हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा आरसा असतो. बचत म्हणजे फक्त आर्थिक नियोजन नव्हे, तर सामाजिक शिस्तीचे आणि नैतिक जबाबदारीचे जिवंत प्रतीक आहे. म्हणूनच या जागतिक बचत दिनानिमित्त आपण सर्वांनी ठरवले पाहिजे की बचत करणे म्हणजे फक्त पैसे वाचवणे नव्हे, तर समाजाला स्थैर्य, जबाबदारी आणि शाश्वत भविष्य देणे होय.



**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# विनायकराज प्रतिष्ठान किल्ला स्पर्धेत प्रतापगड प्रथम, जंजिरा द्वितीय, सिंहगड तृतीय क्रमांक

नगर – छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने आजच्या नवीन पिढीला कल्पकतेचा, संस्कृतीचा, वारसा जोपासण्यासाठी सावेडी उपनगरात विनायकराज प्रतिष्ठानने किल्ले बनवा- बक्षिसे मिळवा स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत ६० किल्लयांची अधिकृत नोंदणी झाली होती. यामधून ३ स्पर्धकांना प्रथम, द्वितीय, तृतीय अशी बक्षीस जाहीर करण्यात आली.

सावेडी, सहकारनगर मधील प्रिथील खोलगडे याने प्रतापगड किल्ला साकारला होता त्यास प्रथम तर अवनीश वल्लाल याने जंजिरा किल्ला प्रतिकृती तयार केली त्यास द्वितीय तर अश्विनी मायकर या मुलीने सिंहगड किल्ला तयार करून तृतीय क्रमांक मिळविला. स्पर्धेचे परीक्षक चित्रकार योगेश हराळे यांनी ६० किल्लयांची पाहणी करून बारकाईने त्याचे परीक्षण केले व यामधून या तीन किल्लयांची निवड केली उत्तेजनार्थ लोहगड किल्ला तयार करणाऱ्या वरद पवार, अथर्व दुर्गे या दोघांना बक्षीस जाहीर करण्यात आले.



विनायकराज प्रतिष्ठानने आयोजित किल्ला स्पर्धेत प्रतापगड, जंजिरा व सिंहगड अशा किल्ला प्रतिकृती प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक देण्यात आले.

या स्पर्धेचे आयोजक विनय वाखुरे यांनी सांगितले की नवीन पिढीला इतिहासाची माहिती होणे गरजेचे आहे, मुला-मुलींना अशा स्पर्धांमधून स्वराज्याचे स्मरण व्हावे या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. मोबाईल, टीव्ही यापासून मुलांनी दूर राहावे. मैदानी खेळ, मातीशी नाळ जोडण्याचा आमच्या प्रतिष्ठानचा हा प्रयत्न आहे. स्पर्धेतील विजेत्यांना लवकरच बक्षिसे देण्यात येतील सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक स्मृतीचिन्हे देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे श्री. वाखुरे यांनी सांगितले.

# अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये अहिल्यानगरच्या मनीषा निमोणकरला कांस्य तर कोमल शिंदेला रौप्य पदक

नगर – जम्मू-काश्मीरमध्ये श्रीनगर येथे झालेल्या अखिल भारतीय १० व्या पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये अहिल्यानगर पोलीस दलातील मनीषा निमोणकरने कांस्यपदक तर कोमल शिंदेने रौप्य पदक मिळवले आहे. काश्मीर वरून परतल्यानंतर काल त्यांचा मुंबईमध्ये एडीजे पोलीस मुख्यालयात त्यांचा एडीजे कृष्णप्रकाश यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी एडीजे मधुकर पांडे, आईजी श्री त्रिमुखे, एएसओ श्री कांबळे आदींसह महाराष्ट्रातून ११ पदक प्राप्त खेळाडू उपस्थित उपस्थित होते



अहिल्यानगरच्या मनीषा निमोणकरला कांस्य तर कोमल शिंदेला रौप्य पदक मिळाल्याबद्दल एडीजे कृष्णप्रकाश यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

पींच्याक सिलंट (बॉक्सिंग, कुस्ती, कराटे) या क्रीडा प्रकारात ८० किलो वजन गटात पोलीस मुख्यालयातील मनीषा निमोनकरने दिल्लीच्या पोलीस खेळाडूचा पराभव करून तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक मिळवले तर तोफखाना पोलीस स्टेशनची कोमल शिंदे हिने ८५ किलो वजन गटात पंजाबच्या एसएसबी च्या खेळाडूचा पराभव करत द्वितीय क्रमांक मिळवत रोप्य पदक पटकावले.

अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात त्या दोघी १५ वर्षापासून प्रॅक्टिस करत असून त्यांना पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, आरपीआय परदेशी, स्पोर्ट इन्चार्ज व्हिक्टर जोसेफ यांचे मार्गदर्शन लाभले, नगर जिल्ह्यातून फक्त या दोघींनाच पदके मिळाली आहे. महाराष्ट्रातून एकूण ८५ खेळाडू गेले होते, त्यामध्ये ११ जणांना पदके मिळाली आहेत, आंतर जिल्हा सामने नगर शहरात झाल्यानंतर नाशिक येथे विभागीय सामने झाले व ठाणे येथे स्टेटचे सामने झाले. या ठिकाणी प्रतिस्पर्ध्याला हरवून या दोघींनी महाराष्ट्राच्या संघात स्थान पटकावले होते

# अहिल्यानगरच्या अनुराधा मिश्रा यांना राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ४ सुवर्ण
## स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र किताबाने गौरव, राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड

नगर – इंडियन पॉवरलिफ्टिंग फेडरेशन व मेचर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन (महाराष्ट्र) च्या वतीने नुकत्याच मुंबई, येथे क्लासिक स्टेट पॉवरलिफ्टिंग व डेडलिफ्ट चॅम्पियनशिप ही राज्यस्तरीय स्पर्धा पार पडली. यामध्ये शहरातील अनुराधा मिश्रा यानी उत्कृष्ट कामगिरी करुन चार सुवर्ण पदक पटकाविले. त्यांची राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.



राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत चार सुवर्ण पटकावणाऱ्या अनुराधा मिश्रा.

ही स्पर्धा सबज्युनिअर, ज्युनिअर, सिनीयर व मास्टर गटात पार पडली. यामध्ये महाराष्ट्रातील स्पर्धक सहभागी झाले होते. महिलांच्या सिनीयर गटात पॉवरलिफ्टिंग व डेडलिफ्ट प्रकारात मिश्रा यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन सुवर्ण पदकांची कमाई केली. त्यांना यावेळी स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र किताबाने गौरविण्यात आले. मिश्रा यांना नुकतेच झालेल्या सदर स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे, राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

मिश्रा या सावेडी येथील जिम स्ट्राईकर मध्ये प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. या यशाबद्दल अनुराधा यांचे वडिल श्रीनिवास तिवारी यांनी मुलीच्या कामगिरीबद्दल विशेष शुभेच्छा दिल्या.

# सिद्धीबाग ज्युडो हॉलमध्ये वर्ल्ड ज्युडो डे उत्साहात साजरा

नगर – सिद्धीबाग ज्युडो हॉल येथे २८ ऑक्टोबर रोजी वर्ल्ड ज्युडो डे उत्साहात साजरा करण्यात आला. ज्युडोचे जनक डॉ. जिगारो कानो यांच्या जयंतीनिमित्त जगभरात हा दिवस साजरा केला जातो. यंगमेन्स ज्युडो असोसिएशनच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास अहिल्यानगरचे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते केक कापून या दिनाचा आनंद साजरा करण्यात आला.




सिद्धीबाग ज्युडो हॉलमध्ये वर्ल्ड ज्युडो डे उत्साहात साजरा झाला.

कार्यक्रमात राज्य व राष्ट्रीय स्तरावर ज्युडो खेळात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. तसेच बेल्ट परीक्षेत यश मिळवलेल्या खेळाडूंना बेल्टचे वितरणही करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आंतरराष्ट्रीय ज्युडो खेळाडू आदित्य धोपावकर यांनी केले.

या प्रसंगी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याला आतापर्यंत सर्वाधिक सहा 'शिवछत्रपती पुरस्कार' विजेते खेळाडू या संस्थेने दिले असून, त्यांच्या मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर यांनी जिल्ह्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावर अनेक पदके मिळवून दिली आहेत. एवढे मोठे यश असूनही अजूनपर्यंत जिल्ह्यात पूर्ण मॅट एरिया नसल्याची खंत वाटते. मात्र, यंदा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व क्रीडा संकुलात ज्युडो खेळाडूंसाठी पूर्ण मॅट एरिया उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल आणि तो मंजूर करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी आश्वासन दिले.

तसेच त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, क्रीडा हे देखील एक प्रोफेशन होऊ शकते, परंतु यश मिळवण्यासाठी खेळाडूंनी अनेक प्रलोभनांना दूर ठेवून कठोर परिश्रम आणि त्यागाची तयारी ठेवली पाहिजे.

या कार्यक्रमासाठी अनेक माजी राष्ट्रीय खेळाडूंनी उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अभिजीत दळवी, राष्ट्रीय खेळाडू शिव घेगडे, शुभम दातरंगे, फैयाज सय्यद, सतीश शिंदे, अथर्व नरसाळे, पीयूष शिनगारे, यश शिनगारे, गणेश शिंदे आणि आर्यन आगरकर यांनी परिश्रम घेतले.

अहिल्यानगरमधील यंगमेन्स ज्युडो असोसिएशन ही संस्था गेली अनेक वर्षे जिल्ह्यातील ज्युडो खेळाडूंना प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करून देत आहे. जिल्ह्यातील अनेक युवकांना या खेळाच्या माध्यमातून राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. वर्ल्ड ज्युडो डेच्या निमित्ताने सिद्धीबाग ज्युडो हॉल येथे झालेला हा कार्यक्रम खेळाडू, प्रशिक्षक आणि उपस्थितांच्या सहभागामुळे उत्साहवर्धक वातावरणात पार पडला.

# पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज : प्रसाद मोरे
## माहूर येथे ९ वे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन

नगर – समाजातील प्रत्येक नागरिकाने 'पर्यावरण ही आपली सामूहिक जबाबदारी' या भावनेने पुढे यावे असे आवाहन निसर्ग मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती देताना केले.

माता रेणुका देवीच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या माहूर नगरीत 'पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज' या केंद्रस्थानी ठेवून ९ वे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन उत्साहात झाले. निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन दोन दिवस (२६ व २७ ऑक्टोबर) जगदंबा सेवा समिती धर्मशाळा, माहूर येथे पार पडले.



माता रेणुका देवीच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या माहूर नगरीत 'पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज' या केंद्रस्थानी ठेवून ९ वे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन उत्साहात झाले.

संमेलनाचे अध्यक्ष म्हणून पद्मश्री सय्यद शब्बीर (मामू) तर प्रमुख पाहुणे म्हणून माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप, तसेच निसर्ग मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे व स्वागताध्यक्ष उद्योजक गोपालसिंह चौहान उपस्थित होते. संमेलनाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

मुख्य अतिथी तहसीलदार अभिजीत जगताप यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पर्यावरण संवर्धन हे आता निवड नव्हे तर काळाची अपरिहार्यता आहे. समाजातील प्रत्येक घटकाने यात सहभाग घेतल्याशिवाय ही चळवळ यशस्वी होणार नाही.

संमेलनाचे अध्यक्ष पद्मश्री सय्यद शब्बीर यांनी सर्वांना प्रेरणादायी आवाहन करताना म्हटले की, पर्यावरण चळवळ ही केवळ आंदोलन नव्हे, तर प्रत्येक माणसाचा श्वास आहे. जर आपण निसर्गाशी प्रामाणिक राहिलो तरच भविष्यातील पिढ्या सुरक्षित राहतील.

'जलपुरुष' बाबुराव केंद्रे (लोहा) यांनी पाणीटंचाई, जलसंवर्धन व जलव्यवस्थापन यावर सखोल मार्गदर्शन केले.

ॲड. उदय संगारेड्डीकर यांनी विषमुक्त शेती व देशी गोसंवर्धनावर विचार मांडले.

प्रा. डॉ. रमजान इराणी यांनी वन्यजीव संरक्षण – वास्तव व भ्रम या विषयावर प्रभावी सादरीकरण केले.

दीपक श्रोते यांनी जागतिक तापमानवाढ, बदलते वातावरण आणि मानवी आरोग्य या विषयावर प्रबोधनपर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी संतसाहित्यातून पर्यावरणविषयक मूल्यांचे दर्शन घडवले व शिक्षकांची समाज परिवर्तनातील भूमिका अधोरेखित केली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त माहूर येथील दत्तशिखर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली व प्लास्टिकमुक्त माहूर उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे संयोजन ज्ञानेश्वर कऱ्हाळे व सारनाथ लोणे यांनी केले.

राज्य कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष तसेच सर्व निसर्गप्रेमी उपस्थित होते.

मंडळाच्या कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या छायाताई राजपूत, महेश पाडेकर (राज्य प्रसिद्धी प्रमुख), लतिकाताई पवार, तुकाराम अडसूळ, बाळासाहेब डोंगरे, नानासाहेब गोफणे, सुभाष वाखारे, भाऊसाहेब सोनवणे, अनिल लोखंडे, प्रकाश केदारी, संतोष परदेशी, चंद्रशेखर हासे, बबन जाधव, आशा कांबळे, वर्षा घुले, अशोक भोसले, शालिनीताई आंबरे, चंद्रकांत भोजने, दादासाहेब जवरे, राजकुमार गिरी आदींचा सहभाग उल्लेखनीय होता.

या दोन दिवसांच्या पर्यावरण संमेलनाने 'पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा' हा संदेश समाजाच्या मनामनात रुजवला.

# नगरच्या ठाकूरदास परदेशी यांनी तयार केलेल्या विजयदुर्ग किल्लयाची प्रतिकृती पाहण्यासाठी खुली



नगर – शांतीनगर येथील ठाकुरदास परदेशी व त्यांच्या कुटुंबीयांनी साकारली आहे. दहा बाय दहा आकाराची जलदुर्ग विजयदुर्ग ची प्रतिकृती. गेल्या १२ वर्षापासून विविध किल्लयांची प्रतिकृती सदर कुटुंब तयार करीत आहेत. ही प्रतिकृती दरवर्षी दिवाळीनंतर लोकांना पाहण्यासाठी खुली असते.

यावेळी बुधवार पासून सर्वांसाठी खुली करण्यात आली आहे. विजयदुर्ग किल्लयाची प्रतिकृती त्यासाठी पत्ता ठाकूरदास परदेशी प्लॉट नं.२, शांतीकुंज, शांतीनगर (सारसनगर), पाण्याची टाकीजवळ अहिल्यानगर. ९८६०२०७०७६ या नंबरवर संपर्क साधावे.

ही प्रतिकृती १०/११/२०२५ पर्यंत सर्वांसाठी खुली आहे. लोकांनी या ठिकाणी भेट द्यावी. (प्रतिकृति पाहण्यासाठी साठी सकाळी ९ ते रात्री ९ वा. पर्यंत वेळ आहे) असे आवाहन ठाकुरदास परदेशी यांनी केले आहे.

# शिव पाणंद शेतरस्ता सीमांकनाची प्रक्रिया निरंतर

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर – जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देणारा निर्णय घेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी स्पष्ट केले की, शेत व शिव पाणंद रस्त्यांचे सीमांकन, हद्दी निश्चिती, सांकेतिक क्रमांक देणे आणि अतिक्रमणमुक्त रस्ते मजबूत करण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू राहणार आहे.



महाराष्ट्र राज्य शेत व शिव पाणंद रस्ता चळवळीचे प्रणेते व अध्यक्ष शरद पवळे, उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे-पाटील, विनोद गोळे, बापूराव चव्हाण, विठ्ठल निर्मळ यांनी सीमांकन कार्यपद्धतीला मुदतवाढ देण्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक लवेसू-२०२५/प्र.क्र. ४५८/भूमापन-१, दि. २९ ऑगस्ट २०२५ नुसार तहसील कार्यालयांना शेतरस्त्यांचे सीमांकन तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सेवा पंधरवड्यानिमित्त सुरू झालेली ही मोहीम आता कायमस्वरूपी व निरंतर राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कामकाजावर प्रभावी देखरेख ठेवण्यासाठी ग्रामीण, तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय शेतरस्ता समित्या लवकरच स्थापन करण्यात येणार असल्याचेही डॉ. आशिया यांनी सांगितले. या समित्यांद्वारे सीमांकन, अंमलबजावणी आणि तक्रारींचा निपटारा अधिक वेगाने करण्यात येईल. शेतरस्त्यांशी संबंधित अपील प्रकरणांबाबत जिल्हा न्यायाधीश श्रीमती शेंडे यांच्याशी चर्चा होऊन कलम १४३ व ५२ अंतर्गत प्रकरणांचा जलद निपटारा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे न्यायासाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

प्रत्येक गावातील शिवार फेरी घेऊन शेतरस्त्यांचे सीमांकन प्रत्यक्ष पाहणीसह पूर्ण करण्यात येणार आहे. यामुळे रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवून वाहतुकीसाठी सुगम मार्ग तयार होणार आहे. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य शेत व शिव पाणंद रस्ता चळवळीचे प्रणेते व अध्यक्ष शरद पवळे, उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे-पाटील, विनोद गोळे, बापूराव चव्हाण, विठ्ठल निर्मळ यांनी सीमांकन कार्यपद्धतीला मुदतवाढ देण्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले. यावेळी शासकीय विश्रामगृह येथे देखील बैठक घेण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. लक्ष्मण मतकर, बाळासाहेब थोरात, कानिफनाथ कदम, प्रशांत चौधरी, कैलास दहिफळे, रामदास तनपुरे, प्रकाश देवकाते, बाजीराव जगदाळे, उषा हुके, रावसाहेब पंडित, रमेश भक्त, अनिल सरोदे, गोपीनाथ लोंढे, सिद्धार्थ दहातोंडे, प्रतीक ठोंबरे, साहेबराव आखाडे, जानको रुपनर, बाबासाहेब मकासरे, देविदास शिंदे, कृष्णादास जठार, विठ्ठल करमळ, सुभाष शेळके, भाऊसाहेब वाळूंज, दशरथ वाळूंज, बबन गुंड आदिसह जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शेतकरी उपस्थित होते.



पेमराज सारडा महाविद्यालयात प्रा.डॉ. माया उंडे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित.

# बालभारतीच्या विशेषाधिकारी प्रा.डॉ.माया उंडे यांचा सत्कार

नगर – सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. माया उंडे यांची पुण्याच्या बालभारतीमध्ये भूगोल विषयासाठी विशेषाधिकारी म्हणून नियुक्त झाल्याबद्दल पेमराज सारडा महाविद्यालयात प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रबंधक अशोक असेरी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरिष पाखरे व कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, प्रा.डॉ. माया उंडे या अहमदनगर महाविद्यालयात उत्कृष्ट सेवा केली आहे. सतत अभ्यास आणि संशोधन करणे हा डॉ. उंडे यांचा मूलतः पिंड असल्यानेच त्यांची बालभारती येथे भूगोल विषयासाठी विशेषाधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांच्या या संशोधनपर अनुभवाचा उपयोग निश्चितच बालभारतीला भूगोल विषयाचा अभ्यासक्रम तयार करताना होणार आहे.

प्रा. डॉ. माया उंडे म्हणाल्या, अभ्यासक्रमाविषयी संशोधन करण्याची आणि त्यासंबंधीच्या योजनांवर काम करण्याची संधी मला मिळाली आहे. हे कार्य मी उत्तम प्रकारे करण्याचा निश्चितच प्रयत्न करेन. सारडा महाविद्यालयात झालेल्या सत्काराने नवी प्रेरणा मला मिळाली आहे.



जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि अहमदनगर बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला विधिज्ञ बार रूममध्ये कायदे विषयक जागृती शिबिरामध्ये बोलताना वरिष्ठस्तर सह दिवाणी न्यायाधीश यु. टी. मुसळे बोलत होत्या.

# महिला सुरक्षिततेसाठी संवेदनशीलता महत्वाची

## न्यायाधीश यु.टी. मुसळे यांचे प्रतिपादन

नगर – महिलांचे अधिकार, महिलांचे सर्व क्षेत्रात असेलेले योगदान, महिलांवर कामाच्या ठिकाणी होणारे अत्याचार यावर महिलांनी जागृत असणे गरेजेचे आहे. आपले अधिकार व हक्क जोपासले तरच सुदृढ समाजाची निर्मिती होते, असे प्रतिपादन वरिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश यु. टी. मुसळे यांनी केले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा अंजू शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि अहमदनगर बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला विधिज्ञ बार रूममध्ये कायदे विषयक जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी वरिष्ठस्तर सह दिवाणी न्यायाधीश यु. टी. मुसळे बोलत होत्या.

यावेळी न्यायाधीश एम.डी.चऱ्हाटे, न्यायाधीश योगेश पैठणकर, ॲड. राजेश कातोरे, अध्यक्ष ॲड. स्वाती पाटील, ॲड. निर्मला चौधरी आदी उपस्थित होत्या.

न्यायाधीश चऱ्हाटे म्हणाल्या, महिलांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अत्याचारावर प्रतिबंध घालण्यासाठी 'विशाखा' ही अंतर्गत समिती स्थापन केलेली असते. या समितीच्या कामाबदल तसेच पोस्को, रॅगिंग प्रतिबंधक कायदा, माहिती-तंत्रज्ञान कायद्यातील महत्वाच्या तरतुदींची माहिती यावेळी देण्यात आली.

ॲड.अनिता दिघे यांनी प्रस्ताविक केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. अहमदनगर महिला बार असोसिएशनच्या सचिव ॲड. ज्योती हेमणे यांनी सूत्रसंचालन केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी सचिव योगेश पैठणकर यांनी आभार मानले.

# सेवानिवृत्त परिवाराचा गुणगौरव व सामाजिक उपक्रम कौतुकास्पद

## इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे

नगर – टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीत कार्यरत असलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातून निवृत्त झालेल्या सेवानिवृत्त परिवाराने एकत्र येऊन सामाजिक समस्या व गरजा ओळखून अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. समाजासाठी सर्वांनी तन, मन, धनाने एकत्र आले पाहिजे, त्यासाठी दातृत्व, कर्तृत्व, नेतृत्व व वक्तृत्व हे चार गुण अंगीकारले पाहिजेत. तसेच सेवानिवृत्त परिवाराने स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करून गरीब व गरजू लोकांना कपडे वाटून 'माणुसकीची भिंत' उभी केली, असे गौरवोद्गार इंजी. डॉ. विजयकुमार ठुबे यांनी स्नेहमेळावा व गुणगौरव सोहळा कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलताना केले.



टाकळी ढोकेश्वर येथे सेवानिवृत्तांचा स्नेहमेळावा व गुणगौरव सोहळा झाला.

यावर्षी टाकळी ढोकेश्वर येथे गायखे फार्म हाऊसवर नुकताच स्नेहमेळावा व गुणगौरव सोहळा झाला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाळासाहेब बांडे व स्वामी समर्थ बँकेचे अध्यक्ष ॲड. अशोकराव शेळके होते.

सेवानिवृत्तांनी नवीन येणाऱ्या संकटांना सामोरे जाऊन नवीन पिढीशी समन्वय साधून त्यांना योग्य दिशा दिली पाहिजे, तसेच या अगोदरच्या पिढीचा आहार दीर्घायुष्यासाठी किती महत्त्वपूर्ण आहे हे त्यांनी आपल्या भाषणातून पटवून दिले. सेवानिवृत्त परिवार स्थापनेचे हे चौथे वर्ष असून, गुणगौरव कार्यक्रमाव्यतिरिक्त शिवजयंती, वृक्षारोपण, माणुसकीची भिंत, प्री-वेडिंग बंदी, हुंडाबंदी, वधू-वर सूचक कक्ष, सेवानिवृत्त कार्यक्रम, आरोग्य शिबिर, धार्मिक प्रेक्षणीय सहलींचे आयोजन केले जाते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये पीएसआय पदावर निवड झालेल्या अजय विष्णू राऊत, सहाय्यक महसूल पदावर कु. प्रियांका सावकार थोपटे, कु. शुभांगी नानाभाऊ झावरे व एन.डी.ए. साठी निवड झालेली कु. कृष्णप्रिया वासुदेव साळुंखे यांचा स्मृतिचिन्ह, गौरवपत्र व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

सेवानिवृत्त परिवारातील ज्येष्ठ सदस्य बाळासाहेब झावरे यांनी ६४ व्या वर्षी एल.एल.बी. परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल सूर्यभान भालेकर यांनी, वासुंदे गावचे विविध कार्यकारी सोसायटीत चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल व भाऊसाहेब गायखे यांचा सपत्नीक सेवानिवृत्त बद्दल अध्यक्ष व पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच सन्मित्र पतसंस्थेचे चेअरमन विलासराव गोसावी यांचा ७१ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष इंजी. डॉ. विजयकुमार ठुबे यांनी नुकतेच लंडन येथे महाराष्ट्र रत्न पुरस्काराने 'लोकमत'ने गौरविल्याबद्दल तसेच अमेरिका वेस्टर्न युनिव्हर्सिटीने सामाजिक कार्याबद्दल डॉक्टरेट पदवी दिल्याबद्दल सेवानिवृत्त परिवाराने त्यांचा विशेष सत्कार केला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा पतसंस्था संचालक प्रा. किसनराव पायमोडे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय व सत्कार मार्गदर्शक स्वामी समर्थ बँकेचे संचालक तारकराम झावरे यांनी केला. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे ॲड. अशोकराव शेळके, प्रा. सुनील खिलारी, प्रा. माधवराव गायखे, पोपटराव गोरडे, सौ. सुनंदा पायमोडे यांची सूचना व मार्गदर्शनपर भाषणे झाली. याप्रसंगी नारायण खिलारी, ढोकेश्वर पतसंस्था चेअरमन भाऊसाहेब लोंढे, बबनराव झावरे, भिमाजी दाते, राजाराम उंडे, श्रावण गायकवाड, इंजी. ओंकारेश्वर झावरे, सुभाष आवटी, उत्तम भांड, लक्ष्मण ठाणगे, संजय कुसकर, सिताराम ढुस व विश्वनाथ गोरडे आदी ज्येष्ठ सदस्य हजर होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक विस्तार अधिकारी शिवाजीराव वाळुंज यांनी केले. स्वामी समर्थ बँकेचे संचालक अंबादास झावरे यांनी आभार मानले.

# पुरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी अहमदनगर महाविद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप

## करिअर कट्टा व विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम राबविण्यात आला

नगर – अहमदनगर महाविद्यालयातील करिअर कट्टा आणि विद्यार्थी विकास मंडळा यांच्या संयुक्त विद्यमाने पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमात पूरग्रस्त विद्यार्थ्यांना उच्च प्रतीच्या शालेय बॅग, स्टील वॉटर बॉटल, एक्झाम पॅड, फोल्डर, एक डझन ए ४ साईज रजिस्टर, सहा पेन, सहा पेन्सिल, खोडरबर आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.



पुरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी अहमदनगर महाविद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान देणारे माध्यम न राहता, ते सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता आणि समर्पणाची जाणीव निर्माण करणारे प्रभावी साधन बनले पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांना केवळ माहिती पुरवणे हा शिक्षणाचा उद्देश नसून, त्यांच्यात समाजाशी नाळ जोडणारी, विचारशील, कृतीशील आणि संवेदनशील व्यक्तिमत्वे घडवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या उपक्रमासाठी लागणारा निधी महाराष्ट्र राज्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी, करिअर कट्टाच्या माध्यमातून मदत फेरी राबवून संकलित केला. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहाय्यक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' या अभिनव उपक्रमाचे संस्थापक अध्यक्ष यशवंत शितोळे सर यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करिअर कट्टा जिल्हा समन्वयक डॉ. भागवत परकाळ यांनी केले. यावेळी भा.पां. हिवाळे शिक्षण संस्था अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस आणि सचिव विशाल बार्नबस यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, कायम विना अनुदानित विभाग समन्वयक डॉ. सय्यद रज़ाक, आक्युएसी प्रमुख डॉ. प्रसाद लांबरूड, गणित विभाग प्रमुख सुरेश घुले, संशोधन विभाग समन्वयक अभिजीत कुलकर्णी, ग्रंथपाल डॉ. प्रशांत फुगनर, तसेच कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे यांची विशेष उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमात करिअर संसदेचे पदाधिकारी साक्षी मस्के, मस्के पूजा, शिंदे पूजा, गोपळे मनीषा, विधाते अंजू, निकम साक्षी, नजन साक्षी, भगत वैशाली, ढोकणे प्राची, नम्रता सिंग, खान शीफा, आकाश सोनवणे, कनोजिया स्वाती, रोनित मुथा, अर्जुन गहिले उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुमित कोतकर, यश कच्छवा आणि वसीम शेख यांनी विशेष नियोजन आणि समन्वय साधला.

या उपक्रमामुळे पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा मिळून, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल, असा विश्वास महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला. अशा उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचे भान आणि विद्यार्थीहिताचे मूल्य रूजले जात असल्याचे चित्र यामधून स्पष्ट झाले.

# तुमच्याकडे बघून माझ्यातला शिक्षक जागा झाला

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांची भावना; राष्ट्रपती भवनात डॉ.अमोल बागुल यांना बॅज प्रदान

नगर – राष्ट्रपतींची वाट पाहत हातात गुलाब घेऊन उभे असलेले देशभरातील निवडक शिक्षक, कलाकार. एवढ्यात राष्ट्रपतींच्या आगमनाने अमृत उद्यानामध्ये उत्साह संचारतो. त्यांना अभिवादन करण्यासाठी उत्सुक असलेल्या शिक्षकांमध्ये डॉ.अमोल बागुल यांच्याजवळ जेव्हा राष्ट्रपती येतात तेव्हा बागुल त्यांना म्हणतात की १९९४ ते ९७ या कालावधीत आपण रायरंगपूरमध्ये शिक्षिका होतात आणि आज तर समस्त भारताच्या शिक्षिका झालेल्या आहात. हे ऐकून राष्ट्रपती महोदया आनंदाने नमूद करतात की तुमच्याकडे बघून माझ्यातला शिक्षक जागा झाला. शुभेच्छा संदेश व आशीर्वाद देतात. असे चित्र होते राष्ट्रपती भवनाच्या वतीने आयोजित निमित्त शिक्षक, कलाकार सन्मान उपक्रमाचे. भवनाच्या समाज माध्यमांवर हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत आहे.



या उपक्रमासाठी डॉ.बागुल यांची निवड होऊन विशेष निमंत्रण प्राप्त झाले होते. राष्ट्रपती भवनाच्या वतीने विशेष बॅज व प्रेरणादायी भेटवस्तू प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. राष्ट्रपतींच्या या अमूल्य भेटीमुळे अजून ऊर्जा मिळाली असून भविष्यात विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमधून भारतीय विद्यार्थी घडवण्याचे काम अजून वृद्धिंगत करणार आहे, असे प्रतिपादन बागुल यांनी केले. येथील राष्ट्रीय अमृत उद्यान येथे झालेल्या विविध गुणदर्शन सादरीकरण, राज्य वैशिष्ट्ये सादरीकरण, सांस्कृतिक सोहळा, शिक्षक कलाकृती सादरीकरण आदी उपक्रमांमध्ये डॉ. बागुल यांनी सक्रिय सहभाग घेतला. आजपावेतो सुमारे ९ वेळा डॉ.बागुल यांना राष्ट्रपतींची विशेष निमंत्रणे प्राप्त झालेली आहेत.

रायरंगपूर हे ओडिशा राज्यातील मयूरभंज जिल्ह्यामध्ये असलेले एक शहर आहे, जे भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे मूळ गाव म्हणून ओळखले जाते.

# आदर्शवत कामासाठी सर्व मल्टीस्टेट पतसंस्थांनी नियमांचे पालन करणे आवश्यक : धनंजय तांबेकर

नगर – केंद्र सरकारने मल्टीस्टेट पतसंस्थांसाठी आता कडक नियमावली आणली आहे. त्यामुळे या सर्व नियमांने तंतोतंत पालन करणे सर्वनां बंधनकारक आहे. मल्टीस्टेट पतसंस्थांनी काय करावे व काय करू नये याचे भान ठेवणे आवश्यक आहे. ज्यांनी याचा विचार केला नाही त्या पतसंस्था आता गायब झाल्या आहेत. पतसंस्थांनी मोठमोठ्या कर्जदारांच्या मागे न लागता जेवढे छोटे छोटे कर्ज देता येतील ते द्या, तसेच जास्तीत जास्त सोनेतारण कर्जाला प्राधान्य द्या. आदर्शवत दैनंदिन कामकाज करण्यासाठी अशा प्रशिक्षण शिबिराची अत्यंत आवश्यकता आहे. या शिबिरातून मिळणाऱ्या अनुभवाच्या शिदोरीमुळे व्यवस्थापकांनी स्वतःचे ज्ञान अद्यावत करून इतरांनाही अपडेट करावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे संचालक धनंजय तांबेकर यांनी केले.



मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशन आयोजित प्रशिक्षण शिबराच्या समारोप सत्राचे प्रमुख वक्ते महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे संचालक धनंजय तांबेकर यांचे स्वागत करताना फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे. समवेत संचालक कडूभाऊ काळे व शिवाजीराव कपाळे आदी.

मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनच्या वतीने महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील मल्टीस्टेट पतसंस्थांच्या मॅनेजर व अधिकाऱ्यांच्या एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी धनंजय तांबेकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनचे चेअरमन सुरेश वाबळे, संचालक कडूभाऊ काळे व शिवाजी कपाळे आदींसह महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील मल्टीस्टेट पतसंस्थांचे २५० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रशिक्षण शिबिरात तज्ज्ञ व्याख्याते मंगेश देहेडकर यांचे बहुराज्य सहकारी संस्था सुधारणा कायदा व त्यातील प्रमुख सुधारणा तसेच सीए मोहसीन शेख यांचे सावधगिरीचे निकष या विषयांवर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात सुरेश वाबळे म्हणाले, राज्यातील मल्टीस्टेट पतसंस्थेचा कारभार पारदर्शक व स्वच्छ व्हावा यासाठी मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशन प्रयत्नशील आहे. प्रलंबित प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी सातत्याने दिल्ली दरबारी पाठपुरावा करत आहोत. अर्थक्षेत्रातील विविध तज्ज्ञ व्याख्यात्यांच्या प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करून पतसंस्थांच्या अधिकाऱ्यांना व पदाधिकाऱ्यांनीही अपडेट करत आहोत. अशा प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून पतसंस्थांच्या कारभार सुधारणा झाली आहे.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फेडरेशनचे संचालक शिवाजी कपाळे यांनी केले व कडूभाऊ काळे यांनी आभार मानले. फेडरेशनचे सचिव अनिल वर्पे, नागेबाबा मल्टीस्टेटचे भारत दारुंटे व अनिल कदम यांनी शिबिराचे नियोजन केले.

# मंदिर स्वच्छता अभियानास प्रतिसाद

## केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी केले 'विहिंप'चे विशेष कौतुक

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने दीपावली निमित्त मंदिर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाला जिल्ह्यातून प्रतिसाद मिळाला आहे. ठिकठिकाणी मंदिर स्वच्छता करून रांगोळ्या काढून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील अय्यप्पा मंदिर येथे स्वच्छता मोहीम राबवून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. जवळपास अहिल्यानगर जिल्ह्यातील २०० ते २५० मंदिरात स्वच्छता मोहीम राबवून दीपोत्सव करण्यात आला. विहिंपच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्यावतीने दिपावली व पंधरवड्या निमित्त राबविण्यात आलेल्या उपक्रमाचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी विशेष कौतुक केले. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, मनोहर भाकरे, विश्व हिंदू परिषदेचे उपाध्यक्ष वसंत सिंग, जिल्हा मंत्री अनिल जोशी, सहमंत्री शरदराव नगरकर, भाजपाचे वसंत लोढा, बाबु टायरवाले, अजित कृष्णन, के.के. शेट्टी, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर, दुर्गा वहिनीच्या संयोजिका जयश्रीताई पोटे, हिरा शहापुरे, नीलम परदेशी, मीनाक्षी पाठक, अजीता एडके, मिलिंद मोभारकर, गजेंद्र सोनवणे, हरिभाऊ डोळसे, नाना मोरे, अजिंक्य गुरावे, भाजपचे मुकुल गंधे, अ.भा.किसान संघाचे जिल्हा मंत्री निलेश चिपाडे आदी उपस्थित होते.



केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांचा अय्यप्पा मंदिर येथे विहिंपच्यावतीने सत्कार करताना श्रीकांत नांदापूरकर आदी.

राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी देव, देश आणि धर्मासाठी विश्व हिंदू परिषदेचे मोठे योगदान आहे. अयोध्या येथे प्रभु श्रीरामाचे मंदिर निर्माण झाल्यानंतर राम भक्तांमध्ये मोठा उत्साह आहे. विश्व हिंदू परिषदेने मंदिर स्वच्छता अभियानातून नव चैतन्य निर्माण केले आहे. विश्व हिंदू परिषदेचे कार्य कौतुकास्पद आहे.

# गोवंशीय जनावरांची कत्तल करणारी टोळी एक वर्षासाठी हद्दपार

नगर – गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या श्रीरामपूर येथील टोळीला जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी एक वर्षाकरीता हद्दपार केले आहे. घार्गे यांनी अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या सलग चौथ्या टोळीवर कारवाई करत कायद्याच्या कठोर अंमलबजावणीचा संदेश दिला आहे.

टोळी प्रमुख अहमदनुर अब्दुलगणी कुरेशी (वय ३७, रा. सुभेदारवस्ती, वॉर्ड नंबर २, श्रीरामपूर) आणि सदस्य एजाज कादर कुरेशी (वय ३१, रा. कुरेशी मोहल्ला, वॉर्ड नंबर २, श्रीरामपूर) अशी हद्दपार केलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत. या दोघांनी श्रीरामपूर शहरात संघटित गुन्हेगारी टोळी उभारली होती. राज्यात बंदी असलेल्या गोवंशीय जनावरांचे मांस अवैधरित्या विकून त्यांनी आर्थिक फायदा मिळवला, तसेच स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली. त्यांच्या टोळीची गुन्हेगारी वृत्ती इतकी वाढली की, सामान्य नागरिक पोलिसांकडे तक्रार करण्यासही घाबरत होते.

पोलिसांनी याआधीही त्यांच्याविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई आणि गुन्हे दाखल केले, मात्र त्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. परिणामी, भविष्यात गंभीर गुन्हे घडण्याची शक्यता ओळखून, श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला.

सदर प्रस्तावावर उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपुर विभाग यांनी सखोल चौकशी करून शिफारस केली. त्यानंतर पोलीस अधीक्षक घार्गे यांनी सर्व अहवाल तपासून दोन्ही आरोपींना जिल्हा हद्दीतून एका वर्षासाठी हद्दपार करण्याचे आदेश निर्गमित केले.

# युवकाच्या अमानुष हल्लाप्रकरणी सर्व आरोपींना अटक करुन घटनेची उच्चस्तरीय चौकशी करावी

## स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ, मुस्लिम समाज, मातंग समाज आणि ख्रिश्चन समाजाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन



युवकाच्या अमानुष हल्लाप्रकरणी सर्व आरोपींना अटक करुन घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याच्या मागणीचे निवेदन स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ, मुस्लिम समाज, मातंग समाज आणि ख्रिश्चन समाजाच्यावतीने पोलीस अधीक्षकांना देण्यात आले.

नगर – सोनई (ता. नेवासा) येथे मातंग समाजातील तरुण संजय नितीन वैरागर याच्यावर झालेल्या प्राणघातक आणि अमानुष हल्ल्यातील सर्व आरोपींना त्वरित अटक करून त्यांच्यावर मोक्का (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी समस्त स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ, मुस्लिम समाज, मातंग समाज आणि ख्रिश्चन समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी सुशांत म्हस्के, अजीम खान, रोहित आव्हाड, संदीप वाघमारे, प्रतीक बारसे, संजय कांबळे, संदीप वाघचौरे, दानिश शेख, विशाल भिंगारदिवे, सागर चाबुकस्वार, सिध्दांत कांबळे, सिद्धार्थ भिंगारदिवे, सुजित घंगाळे, हरीश अल्हाट, खालिद शेख, यासर शेख, खलील शेख, सागर चाबुकस्वार, विजय शिरसाठ, शहेबाज हाजी, मोसिन शेख, स्वप्निल साठे, जुनेद शेख, समीर शेख, गणेश साठे, नईम शेख, गुलाम शेख, अमित काळे, अजय पाखरे आदी उपस्थित होते.

१९ ऑक्टोबर रोजी सोनई येथे संजय वैरागर या तरुणाला उचलून नेऊन निर्दयपणे मारहाण करण्यात आली. एवढेच नव्हे, तर त्याच्या अंगावर स्कॉर्पिओ गाडी घालून जीवे मारण्याचा प्रयत्न, तसेच अंगावर लघवी करून थुंकणे यांसारख्या अमानुष कृत्यांद्वारे त्याचा छळ करण्यात आला. या घटनेमुळे माणुसकीला काळीमा फासणारा प्रकार घडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आरोपी हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते असून, त्यांचा गुन्हेगारी पार्श्वभूमीशी संबंध असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. मागासवर्गीय आणि आदिवासी कुटुंबांवर जातीय प्रवृत्तीने हल्ले करण्याचा त्यांचा पूर्वेतिहास असल्याचेही शिष्टमंडळाने निदर्शनास आणले.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आरोपींना मोक्कांतर्गत कारवाई करून त्वरित अटक करण्यात यावी. पीडित तरुण संजय वैरागर याच्यावर दाखल करण्यात आलेला खंडणीचा खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा. सध्या शासकीय रुग्णालयात उपचार घेत असलेल्या वैरागर यांना हिंदुत्ववादी संघटनेच्या प्रमुखांनी भेट देऊन गुन्हा मागे घेण्यासाठी धमकी दिल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा. तसेच पीडित कुटुंबास पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात न्याय मिळेपर्यंत मातंग, आंबेडकरी, मुस्लिम आणि ख्रिश्चन समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा इशारा शिष्टमंडळाने दिला आहे. आरोपींवर कठोरात कठोर कारवाई होईपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

# एकल महिलांच्या प्रशिक्षणाला गती द्या : डॉ.पंकज आशिया

नगर – शासनाच्या सर्व विभागाअंतर्गत एकल महिलांच्या प्रशिक्षणाला आणि त्या माध्यमातून त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला गती द्यावी, अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केली.

अहिल्यानगर जिल्हा कौशल्य विकास समितीच्या कार्यकारी मंडळाची बैठक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. त्यावेळी डॉ. आशिया बोलत होते.



अहिल्यानगर जिल्हा कौशल्य विकास समितीच्या कार्यकारी मंडळाची बैठक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली.

यावेळी बोलताना डॉ. आशिया म्हणाले, केंद्र आणि राज्य शासनाने कौशल्य विकास कार्यक्रमाला विशेष प्राधान्य दिले आहे. हा कार्यक्रम अधिक गतिमान होणे आवश्यक असून पुढील आर्थिक वर्षासाठीच्या प्रशिक्षणाचे नियोजन आतापासूनच सुरू करावे, जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराव देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त राजकुमार पंतम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम, उमेद चे सोमनाथ जगताप, माध्यमिक शिक्षण विभागाचे अभयकुमार वाव्हळ, स्व.माणिकराव पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस.व्ही. जाधव, समाज कल्याण विभागाच्या श्रीमती एस. एस. चितळे, उद्योग विभागाचे अभिजीत बोरसे, खादी ग्रामोद्योग विभागाचे एस. ए. सावंत, माविमचे दीपक माने व योगेश कदम, एकात्मिक बालविकास योजनेच्या श्रीमती एस. एस. गोसावी व श्रीमती एस. एस. मेहत्रे, ऑटो क्लस्टरच्या श्रीमती स्नेहा रसाळ, साउ संस्थेचे अशोक कुटे, जनशिक्षणचे बाळासाहेब पवार, सी. वाय. डी. ए.चे मोहन कांडेकर, प्रथम चे दिवाकर भोयर, बार्टीचे दिलावर सय्यद, बालविकास विभागाचे एस. एस. गवळी, समर्पणच्या श्रीमती शीतल आंग्रे व योगेश पिंपळे उपस्थित होते.

प्रारंभी कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त राजकुमार पंतम यांनी २०२५-२६ या वर्षातील प्रशिक्षणाचा आराखडा आणि त्याबाबतची कार्यवाही या संदर्भात अहवाल सादर केला. त्याचप्रमाणे अकार्यक्षम प्रशिक्षण संस्थांना वगळून त्या जागी नवीन प्रशिक्षण संस्थांच्या नियुक्ती करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता घेण्यात आली.

यावेळी बोलताना विनायकराव देशमुख म्हणाले, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने एकल महिलांना आर्थिक सक्षम करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जिल्ह्यात हाती घेण्यात आला आहे. त्या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी तसेच प्रामुख्याने कौशल्य विकास विभाग व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी शासनाच्या नव्या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त एकल महिलांना प्राधान्य द्यावे.

सुनील शिंदे यांनी शासनाच्या नवीन योजनांची माहिती देऊन त्याबाबत नाव नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांचा तपशील सादर केला.

संजय कदम यांनी यावेळी शहरातील एकल महिलांचे सर्वेक्षण तातडीने हाती घेण्यात येत असल्याचे व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना प्रशिक्षण देणे शक्य असल्याचे सांगितले.

सोमनाथ जगताप यांनी आतापर्यंत १०० पेक्षा जास्त एकल महिला लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे सांगुन त्यांच्या यशोगाथेचे सादरीकरण केले. यावेळी विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या संस्थांमार्फत हाती घेतलेल्या एकल महिला प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आढावा सादर केला.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमात सहभागी संस्था व विभागांनी पुढील बैठकीत याबाबतचे सादरीकरण करावे, अशी सुचना केली.

# महापालिकेकडून न्यायाची वाट पाहणारी दिव्यांग जबीन शेख न्यायालयाच्या आदेशानंतरही व्यवसायासाठी जागेच्या प्रतिक्षेत

## २०० चौरस फूट जागा मिळण्याची मागणी; डावलले जात असल्याचा आरोप



नगर – शासन निर्णय आणि उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व्यवसायासाठी २०० चौरस फूट जागा मिळण्याचा हक्क असतानाही ९० टक्के दिव्यांग असलेल्या जबीन फारुक शेख यांना अहिल्यानगर महापालिकेकडून आजवर न्याय मिळालेला नाही. आपल्या उपजीविकेसाठी केवळ एका छोट्या टी स्टॉलच्या माध्यमातून जगण्याचा आधार मिळावा, एवढीच साधी मागणी या दिव्यांग महिलेकडून वारंवार केली जात आहे. पण महापालिका प्रशासनाने त्यांच्या अर्जाकडे दुर्लक्ष करून उलट धडधाकट व्यक्तींना महापालिका आवारात कॅन्टीन देऊन दिव्यांगांच्या हक्कावर गदा आणल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

जबीन शेख यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, मी ९०% दिव्यांग महिला आहे. मला कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीत टीव्ही सेंटर जवळील तहसील कार्यालय परिसरात लहानसा टी स्टॉल सुरू करण्यासाठी अर्ज दिला होता. परंतु जिल्हाधिकारी यांच्याकडूनही त्यांना जागा उपलब्ध झाली नाही. यानंतर २०१७ मध्ये उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. २०२२ मध्ये न्यायालयाने स्पष्ट आदेश दिला की, महापालिकेच्या टीपी स्कीम नं. २६७ मधील १३४१ चौ. मी. प्लॉट क्षेत्रातून २०० चौ. फूट जागा मला देणे योग्य राहील. परंतु न्यायालयाचा आदेश आल्यानंतरही महापालिकेने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. उलट, प्रशासनाने राजकीय दबावाखाली येऊन माझ्यासारख्या दिव्यांग महिलेला न देता धडधाकट व्यक्तीला महापालिकेच्या आवारातील कॅन्टीन चालविण्याची परवानगी दिली, असा आरोप त्यांनी केला आहे.

तसेच ही बाब स्पष्ट दाखवते की कुठेतरी अर्थपूर्ण व्यवहाराची देवाणघेवाण झाली आहे. एका दिव्यांग महिलेच्या हक्कावर अन्याय झाला आहे. मी केवळ माझ्या उदरनिर्वाहासाठी आणि सन्मानाने जगण्यासाठी ही जागा मागत आहे. कृपया मला पर्यायी जागा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी शेख यांनी केली आहे.

त्यांच्या या भावनिक मागणीमुळे पुन्हा एकदा महापालिकेच्या दिव्यांग धोरणांवर आणि अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील दिव्यांग संघटनांनी जबीन शेख यांना पाठिंबा दिला असून, दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने जगण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, मागणी करण्यात आली आहे.

# ओबीसी मोर्चाचे पदाधिकाऱ्यांनी घेतली ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरेंची भेट

## घरकुल योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी योग्य नियोजनाची मागणी



भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेतली.

नगर – भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेतली. या भेटीत ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर यांनी मंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार केला. याप्रसंगी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शहर व जिल्ह्यात घरकुल योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य नियोजन करण्याबाबत गणेश बनकर यांनी ग्रामविकासमंत्री यांचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, भाजप सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि ओबीसी समाजातील कुटुंबांना स्वतःच्या घराचा हक्क मिळावा यासाठी घरकुल योजना राबविण्यात आलेली आहे. घरकुल योजना ही केवळ शासकीय योजना नसून, गरीबांच्या स्वप्नातील घराची पूर्तता करणारी योजना आहे. या योजनेद्वारे सर्वसामान्यांचे स्वप्न साकारण्यासाठी संबंधित अधिकारी यांना सूचना करुन नियोजनाची मागणी त्यांनी ग्रामविकासमंत्र्यांकडे केली.

# रात्रीच्या वेळी घर फोडून सव्वा दोन लाखांचे दागिने पळविले

## सावेडी उपनगरातील घटना, वाढत्या चोऱ्यांनी नागरिक झाले भयभीत

नगर – सावेडी उपनगरात चोऱ्या घरफोड्यांचे प्रमाण वाढले असून दररोज कुठे ना कुठे चोऱ्या होत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे. अशीच एक घरफोडीची घटना सावेडी उपनगरातील भूतकर वाडी येथील भिंगारदिवे मळा येथे २९ ऑक्टोबरला सकाळी उघडकीस आली आहे. या ठिकाणी चोरट्यांनी रात्रीच्या वेळी बंद घर फोडून घरातील कपाटातून २ लाख २३ हजार ३२० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत.

याबाबत उमा गजानन गव्हाणे (वय ४८, रा. भिंगारदिवे मळा, भूतकरवाडी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या शहरातील सर्जेपुरा येथील एका खाजगी रुग्णालयात काम करतात. २८ ऑक्टोबर रोजी त्यांना रात्रपाळी असल्याने त्यांनी रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास घराला कुलूप लावले व त्या कामावर गेल्या. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास त्या कामावरून घरी परतल्यावर त्यांना घराच्या दरवाजाला कुलूप दिसले नाही तसेच कडी कोयंडा तुटलेला दिसला. त्यांनी घरात जावून पाहिले असता घरात सर्वत्र उचकापाचक झालेली दिसून आली.

त्यामुळे घरात चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ त्यांच्या मुलीला तपोवन रोड येथून बोलावून घेत डायल ११२ वर फोन करून पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच तोफखाना पोलिसांचे पथक, श्वान पथक व ठसे तज्ज्ञांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घरात सर्वत्र पाहणी केली. चोरट्यांनी घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले २ लाख २३ हजार ३२० रुपये किंमतीचे दागिने चोरून नेल्याचे यावेळी समोर आले.

पोलिसांनी उमा गव्हाणे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास स.पो.नि. गणेश वारुळे हे करत आहेत.

# घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार करणारी टोळी पकडली

## ३३ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; गुन्हा दाखल, स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई



नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथे घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार करणारी टोळी पकडल्यानंतर जप्त मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार करत त्यामधून अनधिकृतपणे व्यावसायिक गॅस टाक्यामध्ये रिफीलिंग करणाऱ्या तिघांच्या टोळीच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या आहेत. या तिघांच्या ताब्यातून ३३ लाख ६५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथे २९ ऑक्टोबर रोजी रात्री ही कारवाई करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि.किरणकुमार कबाडी यांना गोपनीय माहिती मिळाली की, चिचोंडी पाटील गावात प्रविण नारायण खडके हा त्याचे साथीदारासह त्याचे राहते घराचे आडोशाला घरगुती वापराकरीता असलेला गॅस सिलेंडरचा अवैधरित्या साठा करुन सदरच्या घरगुती गॅस टाक्याची तो व्यावसायिक गॅस टाक्यामध्ये रिफीलिंग करुन बेकायदेशीर विक्री करत आहे. ही माहिती मिळताच त्यांनी पोलिस उपनिरीक्षक अनंत सालुगडे, पोलीस अंमलदार लक्ष्मण खोकले, गणेश लबडे, हृदय घोडके, बिरप्पा करमल, शामसुंदर जाधव, भिमराज खर्से, मनोज साखरे, महादेव भांड, उमाकांत गावडे यांच्या पथकाला कारवाई साठी पाठविले.

या पथकाने प्रविण खडके याच्या घरी छापा टाकला असता सदर ठिकाणी लाल रंगाच्या गॅस टाक्या, चार वाहने मिळुन आली. पथकाने सदर ठिकाणी असलेल्या इसमांना त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांची नावे प्रविण नारायण खडके (वय २८, रा. चिचोंडी पाटील ता.नगर), वैभव आंबादास पवार (वय ४७, रा. सांडवा ता. नगर), गणेश पद्माकर भोसले (वय ३७, रा. काष्टी ता. श्रीगोंदा) जि. अहिल्यानगर असे असल्याचे सांगितले. सदर इसमांना त्यांच्या कब्जात मिळुन आलेल्या घरगुती गॅस टाक्या व त्याचे परवान्याबाबत विचारपुस करता त्याने त्यांच्याकडे कोणत्याही परवाना नसल्याचे सांगुन सदर गॅस टाक्या वाहनामधुन आणुन त्यामधील गॅस व्यावसायिक गॅस टाक्यामध्ये भरत असल्याचे सांगितले. पथकाने सदर ठिकाणावरुन २५ लाख १० रुपये किंमतीची चार वाहने, ८ लाख ३१ हजार ७०० रुपये किंमतीच्या एच. पी. व भारत गॅस कंपनीच्या घरगुती वापराच्या २६४ भरलेल्या व रिकाम्या गॅस टाक्या, तसेच एक गॅस टाक्या भरण्यासाठी वापरण्यात येणारे मशिन,एक इलेक्ट्रॉनिक वजनकाटा असा एकुण ३३ लाख ६५ हजार ५०० रुपये किमतीची मुद्देमाल जप्त केला आहे.

ताब्यात घेतलेल्या आरोपीच्या विरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात बी.एन.एस. कलम २८७, २८८ सह जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७ सह एल पी जी (पुरवठा आणि वितरण नियमन) आदेश २००० चे कलम ३(२)(ब) सह गॅस सिलेंडर अधिनियम २०१६ चे कलम ४३, ४५, ४६, स्फोटके अधिनियम १८८४ चे कलम ९(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

